




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक ७५ * नांदेड * शनिवार, दि. २० मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# रुपाली चाकणकर यांचा महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा

## राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा देणार

## भोंदूबाबा प्रकरणामुळे दोन्ही पदं गमावली



**मुंबई (प्रतिनिधी)–** शेकडो महिलांचा लैंगिक छळ केल्याचा आरोप असलेल्या नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरातमुळे रुपाली चाकणकर चांगल्याच अडचणी वाढल्या आहेत. अशोक खरातसोबत व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओमुळे चाकणकरांना राजीनामा द्यायची वेळ आली आहे. या प्रकरणात दबाव वाढल्यानंतर रुपाली चाकणकर यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. राष्ट्रवादीच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्याकडे त्यांनी राजीनामा सादर केला. तर राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही चाकणकरांना राजीनामा द्यावा लागणार असल्याची माहिती समोर आली आहे.

अशोक खरात प्रकरणामुळे आरोप होत असलेल्या रुपाली चाकणकर यांनी राजीनामा द्यावा अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिल्याची माहिती समोर आली. परंतु, चाकणकरांच्या राजीनाम्याचा निर्णय हा राष्ट्रवादी काँग्रेसचाच असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राष्ट्रवादीकडून शुक्रवारी सकाळीच महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा अशी सूचना रुपाली चाकणकरांना करण्यात आल्याची माहिती आहे. त्यानुसार रुपाली चाकणकर यांनी आधी महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर त्या राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा देणार असल्याची माहिती समोर येत आहे.

## भारतीय रूपयाने आतापर्यंत सर्वात मोठी निचांकी; डॉलरच्या तुलनेत तब्बल ९३.१५ या विक्रमी निच्चांकी पातळीवर पोहोचला

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारतीय रुपयाने देशाच्या आजवरच्या इतिहासात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत आतापर्यंतची सर्वात मोठी ऐतिहासिक नीचांकी पातळी गाठली आहे. सुरुवातीच्या व्यवहारात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया पहिल्यांदाच ९३ चा टप्पा ओलांडून ९३.१५ या विक्रमी निच्चांकी पातळीवर घसरला आहे.

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या वाढत्या संघर्षामुळे आणि ऊर्जा पायाभूत सुविधा विस्कळीत झाल्यामुळे जागतिक पातळीवर अनिश्चितता निर्माण झाली आहे. पुरवठा साखळी विस्कळीत होण्याच्या भीतीने 'ब्रेंट क्रूड'चे दर प्रति बॅरल १०० डॉलर्सच्या वर गेले आहेत. रुपयाची ही घसरण थांबवण्यासाठी आणि त्याला स्थिर करण्यासाठी आता भारतीय रिझर्व्ह बँक बाजारात काही हस्तक्षेप करते का, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. सुरक्षित गुंतवणुकीकडे कल भूराजकीय अनिश्चिततेमुळे जागतिक गुंतवणूकदार 'अमेरिकन डॉलर'सारख्या सुरक्षित पर्यायांकडे वेगाने वळत आहेत, ज्यामुळे डॉलर अधिक मजबूत होत आहे आणि रुपयासारख्या उदयोन्मुख बाजारपेठेतील चलनांवर मोठा दबाव येत आहे.

# अशोक खरातकडे कोट्यवधींची 'माया', राज्य सरकार कारवाईचा फास आवळणार

## एसआयटी चौकशीला वेग; बडे अधिकारी रडारवर



**मुंबई (प्रतिनिधी)–** स्वयंघोषित कॅप्टन अशोक खरात याच्यावर महिला अत्याचाराचे गंभीर आरोप झाल्यानंतर, आता विशेष तपास पथकाने (एसआयटी) या प्रकरणाचा तपास अधिक तीव्र केला आहे. डिजीटल पुरावे आणि फॉरेन्सिक तपासाच्या आधारे खरातचे संपूर्ण नेटवर्क उद्धवस्त करण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे.

एसआयटीकडून सध्या खरातचे फोन कॉल्स, चॅट्स आणि सोशल मीडिया अकाऊंट्सची कसून चौकशी केली जात आहे. पोलिसांच्या हाती लागलेल्या धक्कादायक व्हिडिओंमधील पीडितांना न्याय मिळवून देणे, हा तपासाचा प्राथमिक उद्देश आहे. या व्हिडिओंमध्ये दिसणाऱ्या महिलांची ओळख पटवून त्यांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू झाले आहे.

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, खरातच्या तथाकथित 'दरबारात' अनेक बड्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचा वावर होता. धक्कादायक बाब म्हणजे, या अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांच्या नावावर खरातने अनेक ठिकाणी जमिनींची खरेदी-विक्री केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या संशयास्पद आर्थिक व्यवहारांची आणि 'खरात नेटवर्क'ची साखळी पोलीस आता शोधून काढणार आहेत. नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील मोक्याच्या ठिकाणी खरातने मोठी गुंतवणूक केल्याची चर्चा आहे.

## १ एप्रिलपासून फास्टॅग टोल पास महागणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय महामार्गांवर प्रवास करणे आता महाग होणार असून दि. १ एप्रिल २०२६ पासून नव्या दरांची अंमलबजावणी होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने फास्टॅगच्या किंमतीत ७५ रुपयांनी वाढ केली आहे. आधी हा पास ३ हजार रुपयांना मिळायचा. १ एप्रिलपासून हा पास ३ हजार ७५ रुपयांना मिळणार आहे.

## डी गँगचा सदस्य एलसीबीच्या जाळ्यात; दोन पिस्तूल आणि दहा जिवंत काडतूसं जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात दहशत पसरविणाऱ्या डी गँगचा सदस्य स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकला. पोलिसांनी त्याच्याकडून दोन पिस्तूल आणि दहा जिवंत काडतूसं असा घातक शस्त्रसाठा जप्त करून गुन्हा दाखल केला आहे.



दि. १९ मार्च रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे व त्यांचे पथक यांना किसान तीर्थ चिंचाळा फाटा बसस्थानक येथे एक युवक दोन पिस्तुल, दहा काडतूसं, तीन मॅग्जिन बाळगून असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाली. प्राप्त माहितीनुसार चिंचाळा फाटा बसस्थानक येथे रखी ऊर्फ रवीलाला नारायणसिंह ठाकुर (वय ३८ वर्ष व्यवसाय व्यापार रा. गाडीपुरा इतवारा नांदेड) हा संशयितरित्या आढळला. त्याची दोन पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्याकडून दोन पिस्तुल, दहा काडतूसं, तीन मॅग्जिन असा एकूण ५९ हजार रूपयांचा अवैध मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कारवाईसाठी आरोपीस बिलोली पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

# पायाभूत सुविधा बळकटीसाठी ठोस निर्णयांवर भर –मंत्री संजय राठोड



**नांदेड (प्रतिनिधी)–** देश व राज्य पातळीवर पायाभूत सुविधा मजबूत करण्यासह सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाकडून ठोस व धोरणात्मक निर्णय घेतले जात आहेत, असे प्रतिपादन राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले.

दि. २० मार्च रोजी माहूर तालुक्यातील पैनगंगा नदीपात्रात उभारण्यात येणाऱ्या शक्तिपीठ बंधाऱ्याच्या भूमिपूजन सोहळ्यावेळी ते बोलत होते. हा सोहळा दीक्षागुरू प्रेमसिंग (बापू) महाराज यांच्या हस्ते भूमिपूजन पार पडले. यावेळी आमदार भीमराव केराम, आमदार बाबुराव कोहळीकर, आमदार किसनराव वानखेडे, नगराध्यक्ष फिरोज दोसानी, माजी जि.प. उपाध्यक्ष समाधान जाधव, धरमसिंग राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.


पुढे बोलताना मंत्री राठोड म्हणाले की, माहूर गडावर दरवर्षी लाखो भाविक येतात व पैनगंगा नदीत स्नान करतात, मात्र आवश्यक सुविधा अपुऱ्या आहेत. शक्तिपीठ बंधाऱ्याच्या माध्यमातून भाविकांना विविध सुविधा उपलब्ध होणार असून हा प्रकल्प वर्षभरात पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच विकासकामांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, ही शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना आमदार भीमराव केराम यांनी सांगितले की, प्रेमसिंग (बापू) महाराज यांनी विनामोबदला जमीन उपलब्ध करून दिल्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या सुमारे ३ कोटी ५० लाख रुपयांच्या निधीतून हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या बंधाऱ्यात स्नान घाट, रेलिंग, प्रकाश व्यवस्था, संरक्षण भिंत, पार्किंग व सभामंडप यांसारख्या सुविधांचा समावेश आहे. तसेच या मठासाठी १० कोटी रुपयांच्या निधीची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे.

मतदारसंघात सुमारे ११०० कोटी रुपयांच्या निधीतून तीन उच्च पातळी बंधारे उभारले जात असून त्यातील सर्वात मोठा प्रकल्प किनवट-माहूर मतदारसंघात होत असल्याचे त्यांनी सांगितले. धनोडा उच्च पातळी बंधारा पूर्ण झाल्यानंतर माहूर येथील पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात कमी होईल, असेही त्यांनी नमूद केले.

तसेच सहस्त्रकुंड प्रकल्प मंजुरीसाठी प्रस्ताव शासनाकडे सादर केला असून त्याद्वारे सुमारे २२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी आमदार बाबुराव कोहळीकर व किसनराव वानखेडे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधाकर कचकलवार यांनी केले.






**नांदेड :** गोदावरी नदीपात्रात दूषित पाणी मिसळत असल्याने लाखो जलचर प्राणी (मासे) मृत्यूमुखी पडले आहेत. यापूर्वीही अशाच प्रकारची घटना घडली होती. (छाया : करणसिंह बैस)




जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# ॲसिडची भीषण सत्यकथा : व्यवस्थेचे अपयश

अजूनही बालपणाच्या कोवळ्या सावलीत असलेल्या तेरा वर्षांच्या मुलीचे जग इतक्या निर्दयीपणे उद्ध्वस्त होईल, याची कल्पनाही करवत नाही. शाळेची घंटा, मित्रमैत्रिणी, गृहपाठ आणि छोट्या-छोट्या स्वप्नांनी भरलेले तिचे आयुष्य एका क्षणात विद्रुप झाले. अहिल्यानगर जिल्ह्यातील वडगाव पान येथे शाळेतून घरी परतताना एका सहावीत शिकणाऱ्या मुलीच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकण्यात आले. हल्लेखोर क्षणात पसार झाला, पण त्या मुलीचे आयुष्य 'पूर्वी' आणि 'नंतर' अशा दोन वेगळ्या टप्प्यांत विभागले गेले. ही घटना केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नाही, तर संपूर्ण समाजाच्या असंवेदनशीलतेचे आणि व्यवस्थेच्या अपयशाचे ज्वलंत उदाहरण आहे. वडिलांचे छत्र हरपलेले, आई मजुरी करून संसार चालवणारी आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत कमकुवत परिस्थितीत वाढलेली ही मुलगी आज रुग्णालयात जीवन-मरणाच्या संघर्षात आहे. प्रशासन उपचारांची हमी देईल, पोलीस तपास सुरू असल्याचे सांगतील, सीसीटीव्ही फुटेज तपासले जाईल, पण या सगळ्या औपचारिक प्रक्रियेच्या मागे एक कटू सत्य लपलेले आहे, अशा घटनांना रोखण्यात आपण अपयशी ठरलो आहोत. ॲसिड हल्ले हे केवळ क्षणिक रागातून घडणारे गुन्हे नाहीत, तर ते सहज उपलब्धतेचे परिणाम आहेत. नियोजनबद्धरीतीने केलेला हा हमला आहे. कायदे असूनही ॲसिड आजही सहज, स्वस्त आणि कोणतीही ठोस चौकशी न करता मिळू शकते. रेल्वेचे तिकीट घेण्यापेक्षा कमी प्रश्न विचारले जातात, ही वस्तुस्थिती अधिक भयावह आहे. त्यामुळे प्रत्येक ॲसिड हल्ला हा केवळ एका व्यक्तीचा गुन्हा नसून, तो संपूर्ण व्यवस्थेच्या निष्क्रियतेचा आणि अंमलबजावणीतील ढिलाईचा पुरावा ठरतो. या घटनेत सर्वात अस्वस्थ करणारी बाब म्हणजे पीडितेचे वय, फक्त तेरा वर्षे. या वयात एखाद्या मुलीला अशा क्रूरतेचा सामना करावा लागणे, हे समाजातील वाढत्या हिंसक प्रवृत्तीचे द्योतक आहे. हल्ल्याचे कारण अस्पष्ट अशी नेहमीची ओळ या वेळीही ऐकू येते, पण यामागे दडलेली भीती अधिक गंभीर आहे. जेव्हा नापाक लोकांकडून अशा प्रकारची हिंसा कारणाविना घडू लागते, तेव्हा ती समाजाच्या नैतिक अधःपतनाची स्पष्ट खूण असते. यामध्ये सामाजिक विषमता आणि अधोगती देखील प्रकर्षाने दिसून येते. ॲसिड हल्ल्याचे बळी बहुतांश वेळा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील असतात. त्यांच्या वेदना कमी दिसतात, त्यांच्यासाठी न्याय मिळवण्याची गती मंद असते आणि पुनर्वसनाची प्रक्रिया अधिकच अनिश्चित असते. वैद्यकीय उपचार, मानसिक आधार आणि आर्थिक मदत या गोष्टी अजूनही ठोस धोरणाऐवजी दयाभावावर अवलंबून आहेत, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. अशा घटना केवळ संताप व्यक्त करून विसरता कामा नयेत. त्या आपल्याला कृतीस प्रवृत्त करायला हव्यात. ॲसिड विक्रीवरील नियमांची कडक अंमलबजावणी ही आता पर्याय नसून, अत्यावश्यक गरज आहे. प्रत्येक विक्रीची नोंद, ओळखपत्राची सक्ती आणि नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली गेली पाहिजे. त्याचबरोबर अशा प्रकरणांसाठी जलदगती न्यायालयांची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे, जेणेकरून न्याय केवळ मिळणार नाही, तर तो वेळेत मिळेल. याहूनही महत्त्वाचे म्हणजे पीडितेला आयुष्यभरासाठी सर्वसमावेशक आधार देणे ही राज्याची जबाबदारी आहे. केवळ उपचारापुरते नाही, तर शिक्षण, पुनर्वसन, मानसिक आरोग्य आणि आर्थिक स्थैर्य यांचा समावेश असलेली दीर्घकालीन योजना आवश्यक आहे. हे कोणत्याही प्रकारचे उपकार नसून तिचा हक्क आहे, हे मान्य करावे लागेल. समाजाचे मूल्यमापन हे तो आपल्या सर्वात दुर्बल घटकांचे, विशेषतः मुलांचे व मुलींचे, किती संरक्षण करतो यावर होते. वडगाव पान येथील ही घटना त्या कसोटीवर आपले अपयश ठळकपणे दाखवते. प्रश्न आता केवळ संतापाचा उरलेला नाही, प्रश्न आहे तो कृतीचा. आणखी एक बालपण जळून खाक होण्यापूर्वी आपण खरोखर जागे होणार आहोत का? सध्या तरी या प्रश्नाचे उत्तर धूसर आणि निराशाजनकच दिसते.

# सनईवादक भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खाँ

सनईसारख्या अवघड वाद्यातील सुरावट अत्यंत नजाकतीने सादर करणाऱ्या भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खाँ यांची आज १०८ वी जयंती. आजही मंगल कार्यात सनई वाजविणारे न मिळाल्यास खाँ साहेबांच्या वादनाची सीडी वाजविली जाते. सनईला बिस्मिल्ला खाँ यांनी पारंपरिक शास्त्रीय संगीताच्या मैफलीच्या मखमली गालीचावरच नेऊन बसविले नाही तर या भारतीय वाद्याला जगप्रसिद्ध केले.

बिस्मिल्ला खाँ यांनी भारताच्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावर आणि पहिल्या प्रजासत्ताक दिनी सनईवादन करून देशवासियांना मंत्रमुग्ध केले होते. धार्मिक सौहार्दाचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिस्मिल्ला खाँ यांच्यासाठी संगीत हेच जीवन होते. वाराणसीच्या मंदिरात आणि गंगेच्या घाटावर सनईवादन करणारे बिस्मिल्ला खाँ सरस्वतीचे सच्चे अनुयायी होते. कन्नड अभिनेते राज-कुमार यांच्या 'सनादी अप्पण्णा' या चित्रपटासाठी त्यांनी सनईवादन केले, तर सत्यजित राय यांच्या 'जलसाघ्रर' या चित्रपटात त्यांनी भूमिका साकारली. 'गुंज उठी शहनाई' या हिंदी चित्रपटातील त्यांचे सनईवादन फारच लोकप्रिय ठरले.

भारतातील प्रख्यात सनई (शहनाई) वादक बिस्मिल्ला खाँ यांचा जन्म बिहारमधील डुमराव या गावी २१ मार्च १९१६ रोजी एका संगीतकार कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव पैगम्बर ख़ाँ आणि आईचे नाव मिट्ठन बाई होते. त्यांचे लहानपणीचे नाव कमरुद्दीन होते. तथापि पुढे त्यांच्या आजोबांनी त्यांना 'बिस्मिल्ला' म्हणण्यास सुरुवात केली आणि पुढे त्याच नावाने जग त्यांना ओळखू लागले. ख़ाँ यांचे पूर्वज मुघल काळात बिहारच्या भोजपूरमध्ये सरदारांच्या महालात वादक म्हणून आपली कला सादर करीत असत. बिस्मिल्ला खाँ यांचे वडील बिहारच्या डुमराव रियासतचे महाराजा केशव प्रसाद सिंह यांच्या दरबारात सनईवादन करायचे. वयाच्या सहाव्या वर्षापासूनच ख़ाँ यांनी त्यांचे मामा प्रसिद्ध सनईवादक अली बक्ष विलायतु यांच्याकडून उत्तरप्रदेशमधील वाराणसी येथे सनईवादनाचे शास्त्रोक्त शिक्षण घेतले. दरम्यान, मामांबरोबर त्यांची साथ करण्यासाठी ते लग्नसमारंभात तसेच संगीत संमेलनात जाऊ लागले. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांनी अलाहाबाद येथील अखिल भारतीय संगीत परिषदेत (१९३०) पहिल्यांदा सनईवादनाचा सार्वजनिक कार्यक्रम केला. त्यानंतर लखनौ येथे झालेल्या संगीत संमेलनात उत्तम वादनाबद्दल त्यांना सुवर्णपदक मिळाले.



१९३७ साली कोलकात्यातील अखिल भारतीय संगीत परिषदेमध्ये सनईचे वादन करून त्यांनी सुवर्णपदके मिळविली. याच संमेलनातून बेगम अख्तर यांनीही आपल्या करिअरची सुरुवात केली होती. त्यानंतर बिस्मिल्ला खान आणि बेगम अख्तर हे एकमेकांचे शिष्य बनले. १९३८ साली त्यांचा लखनौ रेडिओ केंद्रावर प्रथम कार्यक्रम सादर झाला आणि त्यानंतर त्यांच्या सनई वादनाच्या उज्ज्वल कारकिर्दीला सुरुवात झाली. १९४० साली त्यांनी त्यांच्या बंधूसमवेत संगीत मंडळ स्थापन करून कार्यक्रम करण्यास सुरुवात केली. अल्पावधीतच त्यांनी प्रथम श्रेणीचे सनईवादक म्हणून लौकिक प्राप्त केला.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताच्या स्वातंत्र्य दिनी दिल्लीत लाल किल्ल्यावर पंतप्रधान पंडित नेहरुंच्या उपस्थितीत त्यांनी सनईचं वादन केले होते. त्याचसोबत, कान्स आर्ट फेस्टिव्हल, ओसाका ट्रेड फेअर, वर्ल्ड एक्स्पोझिशन, वर्ल्ड म्युझिक इन्स्टिट्युट इत्यादी अनेक सोहळ्यांमध्येही त्यांनी सनई वादन केले आहे.

बिस्मिल्ला खान आणि त्यांच्या साथीदारांनी सनई वादनातून स्वतंत्र भारताच्या पहाटेचं स्वागत केले. १९९७ साली ज्यावेळी भारताच्या स्वातंत्र्यांचा सुवर्णमहोत्सव साजरा केला गेला, त्यावेळीही लाल किल्ल्यावर बिस्मिल्ला खान यांनी सनई वादन केले होते. उस्ताद बिस्मिल्ला ख़ाँ हे जात-पात मानत नव्हते. त्यांच्या करिता 'संगीत' हाच एक धर्म होता. संगीत कुठल्याही नमाज किंवा प्रार्थनेपेक्षा सर्वोच्च आहे. संगीताबद्दल त्यांचे हे अध्यात्मिक गुणच श्रोत्यांना भावत असत आणि त्यांच्याशी जोडले जात असत. बिस्मिल्ला खान आणि महान सतारवादक उस्ताद विलायत खान यांच्यात अनोखं नातं होतं. जेव्हा कधी जुगलबंदीची वेळ येत असे, तेव्हा विलायत खान हे बिस्मिल्ला खान यांच्यासोबत सतार वाजवणं पसंत करत. एकदा विलायत खान यांनी बिस्मिल्ला खान यांच्याबद्दल म्हटलं होतं, 'माझा आणि बिस्मिल्लाह खान यांचा आत्मा एकच आहे'.

बिस्मिल्ला खान यांना सिनेमे पाहण्याची आवड होती. सुलोचना या त्यांच्या आवडत्या अभिनेत्री होत्या. १९५९ साली त्यांनी 'गूँज उठी शहनाई' या सिनेमात संगीत दिग्दर्शनही केले होते. 'दिल का खिलौना हाए टूट गया' या गाण्याला बिस्मिल्ला खान यांनी संगीत दिले होते. यशाने अक्षरशः त्यांच्या पायाशी लोटांगण घातलं होतं. मात्र, त्यांच्या जीवनशैलीत यामुळे अजिबात बदल झाला नाही. साधी राहणीच ते पसंत करत. बिस्मिल्ला खान यांनी आयुष्यभर स्वतःचे कपडे स्वतःच धुतले. इस्त्री न करताच ते कपडे घालायचे. एक पलंग आणि एक खुर्ची यापलिकडे त्यांच्या खोलीत काहीच नव्हतं. कधीच कार खरेदी केली नाही. रिक्षानेच जात. कधीच दारू प्यायले नाहीत. कधी कधी विल्सची एखादी सिगरेट मात्र ओढत असत.

एकदा बिस्मिल्ला खान यांच्या चाहत्यानं त्यांच्या घरात कुलर लावण्यासाठी पुढाकार घेतला. मात्र, बिस्मिल्लाह खान यांनी त्यास नकार दिला आणि तो सर्व पैसा गरीब विधवांना देण्यास सांगितलं. जागतिक स्तरावर धर्मनिरपेक्ष भारताची ओळख म्हणून बिस्मिल्ला खान हे अभिमानाने वावरले. जगाच्या कानाकोपऱ्यात त्यांच्या सनईचे सूर पोहोचले असून लाखो लोक त्यांच्या सुरांनी मंत्रमुग्ध झाले. २००६ साली जेव्हा संकटमोचन मंदिरावर हल्ला झाला, तेव्हा बिस्मिल्ला खान यांनी गंगेच्या काठावर शांतता नांदण्यासाठी सनई वाजवली होती. त्यांनी सनईतून केवळ गाणे वाजवले, ते गाणे होते, 'रघुपति राघव राजा राम...!' त्यांना लोकांना वेगळं कोणतंच आवाहन करावं लागलं नाह. त्यांचा भारतरत्न(२००१), पद्मविभूषण (१९८०), पद्मभूषण (१९६८), पद्मश्री (१९६१), संगीत नाटक अकादमी फेलोशिप (१९९४), संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९५६), तानसेन पुरस्कार आदी अनेक मानद पुरस्कारांनी गौरव झाला आहे. इराण सरकारकडून देण्यात येणाऱ्या 'तलार मौसिक' या पुरस्कारानेही त्यांना सन्मानित करण्यात आले होते. बनारस हिंदू विद्यापीठ आणि विश्व भारती विद्यापीठातर्फे त्यांना मानद डॉक्टरेटही देण्यात आली. २१ ऑगस्ट २००६ रोजी कार्डिॲक अरेस्टने बिस्मिल्ला खाँ यांचा मृत्यू झाला.

**-प्रा. विजय कोष्टी,**
कवठे महांकाळ, जि. सांगली
मो. ९४२३८२९११७

# अन्यायाविरुद्धचा जाज्वल्य संघर्ष किरणजीत अहलुवालिया



भारतीय समाजात विवाह संस्था ही पवित्र आणि स्थिर मानली जाते; परंतु या नात्याच्या आड अनेक स्त्रिया लैंगिक, मानसिक आणि शारीरिक अत्याचारांना सामोरे जातात, ही एक कटू वस्तुस्थिती आहे. अनेक वेळा या अत्याचारांना घरगुती बाब म्हणून दुर्लक्षित केले जाते, ज्यामुळे पीडित महिलांना न्याय आणि आधार मिळणे अधिक कठीण होते. अशा परिस्थितीतही अनेक स्त्रिया अपार सहनशक्ती दाखवत आपल्या कुटुंबासाठी संघर्ष करतात, तर काही स्त्रिया अन्यायाविरुद्ध ठामपणे उभ्या राहून प्रतिकार करतात आणि समाजासाठी एक नवा आदर्श निर्माण करतात.दीर्घकाळ चालणारे अत्याचार स्त्रीच्या मनावर खोल जखमा करतात. तिच्या आत्मविश्वासावर परिणाम होतो, तिचे स्वातंत्र्य हिरावले जाते आणि ती एका भीतीच्या चक्रात अडकून पडते. मात्र, इतिहास आणि वर्तमान काळात अशा अनेक स्त्रिया आहेत ज्यांनी या चक्रातून बाहेर पडण्याचे धाडस दाखवले. त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवला, कायदेशीर लढाई लढली आणि स्वतःसाठी तसेच इतर महिलांसाठीही न्यायाचा मार्ग खुला केला.




आजच्या काळात स्त्रिया शिक्षण, कायदे आणि सामाजिक जागरूकतेच्या माध्यमातून अधिक सक्षम होत आहेत. त्या अत्याचार सहन करण्याऐवजी त्याविरुद्ध लढण्याचा मार्ग स्वीकारत आहेत. या संघर्षातूनच एक नवा समाज निर्माण होतो. जिथे स्त्री केवळ सहन करणारी नाही, तर स्वतःच्या हक्कांसाठी लढणारी आणि इतरांसाठी प्रेरणा ठरणारी शक्ती आहे. आज आपण या यशोगाथेच्या माध्यमातून अशाच एका धैर्यशील स्त्रीचे जीवन अनुभवणार आहोत. ते म्हणजे किरणजीत अहलुवालिया. त्यांचे आयुष्य हे याच संघर्षाचे जिवंत उदाहरण आहे. दीर्घकाळ सहन केलेल्या कौटुंबिक हिंसाचारानंतर त्यांनी केलेला प्रतिकार हा केवळ वैयक्तिक नव्हता, तर त्याने न्यायव्यवस्थेलाही नव्याने विचार करण्यास भाग पाडले. अशा घटनांमुळे समाजाला हे उमगते की, स्त्रीची सहनशीलता अमर्याद असली तरी तिच्या आत्मसन्मानाला धक्का बसल्यावर ती अन्यायाविरुद्ध उभी राहू शकते.

१९८९ साली इंग्लंडमध्ये घडलेली किरणजीत अहलुवालिया यांची घटना ही केवळ एका गुन्ह्याची कहाणी नसून, ती एका स्त्रीच्या दीर्घकाळ सहन केलेल्या अत्याचारांमधून उभ्या राहिलेल्या प्रतिकाराची वेदनादायी साक्ष आहे. त्यांच्या आयुष्याचा प्रवास हा अन्याय, वेदना, संघर्ष आणि शेवटी न्याय मिळवण्याचा एक महत्त्वपूर्ण अध्याय ठरतो. किरणजीत यांचे बालपण पंजाबमध्ये प्रेमळ वातावरणात गेले. मात्र, किशोरवयातच त्यांच्यावर विवाहाचा दबाव आला आणि त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांचे लग्न झाले. विवाहानंतर त्यांनी ज्या संसाराची स्वप्ने पाहिली होती, ती लगेचच भंग पावली. त्यांच्या पतीकडून त्यांना सतत शारीरिक, मानसिक आणि भावनिक अत्याचारांना सामोरे जावे लागले. रोजच्या जीवनात मारहाण, शिवी-गाळ, धमक्या आणि अपमान हा जणू त्यांच्या आयुष्याचा भाग बनला होता. अत्याचारांची तीव्रता इतकी होती की, त्यांनी अनेकदा घर सोडण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रत्येक वेळी त्यांना परत आणून अधिक छळ सहन करावा लागला.

समाज, कुटुंब आणि पारंपरिक बंधने यामुळे त्यांना या नात्यातून बाहेर पडणे अशक्य झाले. मुलं झाली तर तो बदलेल या आशेवर त्यांना परत त्या नरकात ढकलण्यात आले, पण परिस्थिती अधिकच बिकट झाली. या सर्व अत्याचारांचा कळस १९८९ मधील वसंत ऋतूतील ती काळ रात्र.त्या सायंकाळी, दीपक अहलुवालियाने आपल्या पत्नीचे केस मुठीत घट्ट पकडून, एक तापलेली इस्त्री तिच्या चेहऱ्याला लावली. त्याच्या पकडीतून सुटण्यासाठी ती धडपडत असताना, त्या इस्त्रीने तिची त्वचा भाजून काढली आणि तिच्या चेहऱ्यावर एक कायमची खूण उमटवली. या सर्व अत्याचारांचा अंत या भीषण घटनेत झाला. तिला रात्री वेदनांनी पछाडले आणि तिच्या मनात प्रतिशोधाची भावना जागृत झाली. तिला वाटले की, आपल्याला होत असलेल्याह्या वेदना दीपकला कळल्या पाहिजे. हा त्रास तिला शारीरिक व मानसिक दोन्ही स्तरावर होऊ लागला. त्यावेळी तिच्या डोक्यात एकच होते की, त्याला या वेदनांची जाणीव करून देणे, आणि त्या रात्री दीपक जेव्हा झोपला तेव्हा त्यांनी आपल्या पतीच्या पायावर पेट्रोल ओतून आग लावली. त्यामागे त्यांचा उद्देश त्याला ठार मारण्याचा नसून, त्याला त्याचप्रमाणे वेदना जाणवाव्यात हा होता, असे त्यांनी सांगितले. परंतु, काही दिवसांनी त्यांच्या पतीचा मृत्यू झाला आणि त्यानंतर त्यांना खुनाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली.

न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान, त्यांच्या आयुष्यभराच्या अत्याचारांकडे सुरुवातीला दुर्लक्ष करण्यात आले. त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. या निर्णयामुळे समाजात मोठी चर्चा निर्माण झाली. अनेकांना असे वाटले की, न्यायालयाने त्यांच्या परिस्थितीचा योग्य विचार केला नाही. आणि त्याचवेळी तिची ही कायदेशीर लढाई साउथॉल ब्लॅक सिस्टर्स (SBS) या कृष्णवर्णीय आणि आशियाई महिलांच्या हक्कांसाठी कार्यरत असलेल्या संस्थेने हाती घेतली. या संस्थेने किरणजीत यांच्या प्रकरणाला केवळ एक गुन्हा म्हणून न पाहता, त्यामागील सामाजिक, आणि मानसिक घटक न्यायालयासमोर मांडले. त्यांनी या प्रकरणाला दीर्घकाळ चाललेल्या अत्याचारांचा व्यक्तीच्या मानसिक स्थितीवर होणारा परिणाम कसा असू शकतो, अत्याचारित व्यक्ती स्वतःला वाचवण्यासाठी काय करू शकते हे स्पष्ट केले, आणि याच अपिलावर १९९२ परत नव्याने विचार करण्यात आला. न्यायालयाने हे मान्य केले की, सततच्या अत्याचारामुळे त्यांच्या मानसिक स्थितीवर गंभीर परिणाम झाला होता. परिणामी, त्यांची शिक्षा खुनाऐवजी 'सदोष मनुष्यवध'या पुराव्याला धरून कमी करण्यात आली आणि त्यांनी आधीच भोगलेली शिक्षा पुरेशी मानून त्यांची सुटका करण्यात आली. या प्रकरणामुळे ब्रिटिश न्यायव्यवस्थेत एक महत्त्वाचा बदल घडून आला. slow-burn reaction या संकल्पनेला मान्यता मिळाली, ज्यामध्ये अत्याचार सहन करणाऱ्या व्यक्तीची प्रतिक्रिया तत्काळ नसून दीर्घकाळ साचलेल्या वेदनांचा परिणाम असू शकते, हे स्वीकारले गेले. त्यामुळे भविष्यात अशा प्रकरणांकडे अधिक संवेदनशीलतेने पाहिले जाऊ लागले.

किरणजीत यांच्या संघर्षाने केवळ त्यांना न्याय मिळवून दिला नाही, तर जगभरातील महिलांसाठी एक नवीन आशेचा किरण निर्माण केला. त्यांच्या प्रकरणावर आधारित Provoked हा चित्रपटही तयार करण्यात आला, ज्यामुळे त्यांच्या कहाणीला जागतिक स्तरावर ओळख मिळाली.

आज किरणजीत अहलुवालिया यांनी आपले आयुष्य नव्याने उभे केले आहे. त्यांनी आपल्या मुलांचे संगोपन केले, स्वतःला सक्षम बनवले आणि समाजात एक सशक्त स्त्री म्हणून उभ्या राहिल्या. त्यांच्या आयुष्याचा प्रवास हा केवळ वेदनेचा नाही, तर पुनर्जन्माचा आणि आत्मविश्वासाचा आहे. ही कहाणी आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते. समाजाने महिलांवरील अत्याचारांकडे दुर्लक्ष न करता, त्यांना योग्य वेळी मदत आणि न्याय मिळवून देणे अत्यावश्यक आहे. किरणजीत यांचा संघर्ष हा अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारा आहे. स्त्री ही केवळ सहनशीलतेचे प्रतीक नाही, तर ती अन्यायाविरुद्ध उभे राहणारी शक्ती आहे. वैवाहिक अत्याचारांच्या अंधारातून बाहेर पडताना तिने दाखवलेले धैर्य प्रेरणादायी आहे. सहनशक्ती आणि स्वाभिमान यामधील संतुलन साधत ती नव्या आयुष्याची वाट तयार करते. अत्याचाराविरुद्ध आवाज उठवणे हेच खरे धैर्य आणि स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. अशा स्त्रियांच्या संघर्षामुळे समाजात न्याय आणि संवेदनशीलता वाढते. अशा संघर्षातूनच एक सशक्त, न्याय्य आणि समतोल समाज घडतो हे चित्रण दाखवणारी ही यशोगाथा.

**-डॉ. दीपाली पांडे देशमुख**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
महाविद्यालय, राणी सावरगाव

# हिरवे हिरवे गार गालिचे : जागतिक वन दिन



२१ मार्च हा दिवस जगभरात जागतिक वन दिन म्हणून साजरा केला जातो. मानवाला निसर्गाने अनेक अमूल्य देणग्या दिल्या आहेत. शुद्ध हवा, पाणी, सूर्यप्रकाश, सागरी संपत्ती यांसोबतच वनसंपत्ती हीदेखील अत्यंत महत्त्वाची देणगी आहे. वन हे पर्यावरणाचा समतोल राखणारे, जीवनाला आधार देणारे आणि पृथ्वीला समृद्ध करणारे महत्त्वाचे घटक आहेत. त्यामुळे वनांचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे, यासाठी दरवर्षी २१ मार्च रोजी जागतिक वन दिन साजरा करून जनजागृती केली जाते.

**वनांचे महत्त्व**

आज जगाच्या ३० टक्क्यांपेक्षा जास्त भूभागावर जंगले पसरलेली आहेत. या जंगलांमध्ये ६० हजारांहून अधिक वृक्षप्रजाती आढळतात. अनेक प्रजाती अद्यापही मानवाला पूर्णपणे ज्ञात नाहीत. प्रगत राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक भरभराटीत समृद्ध वनांचा मोठा वाटा आहे. इतिहासात मेसोपोटेमिया, सीरिया आणि पॅलेस्टाइन यांसारखे प्रदेश एकेकाळी समृद्ध होते; परंतु जंगलांचा ऱ्हास झाल्यानंतर ते प्रदेश हळूहळू उजाड झाले.

वन पृथ्वीच्या पर्यावरणासाठी अत्यंत आवश्यक आहेत. हरितगृह वायूंना शोषून घेणे, जागतिक तापमानवाढ नियंत्रणात ठेवणे आणि हवामानातील बदलांवर नियंत्रण ठेवणे हे महत्त्वाचे कार्य वनांमुळे होते. तसेच जमिनीची धूप रोखण्याचे कामही वने करतात. जमिनीचा फक्त एक इंच सुपीक थर तयार होण्यासाठी शेकडो वर्षे लागतात, परंतु जंगलांचा अभाव असल्यास एका पावसाळ्यातच हा थर वाहून जाऊ शकतो.

**जैवविविधतेचे रक्षण**

वनांमध्ये असंख्य प्राणी, पक्षी, वनस्पती आणि सूक्ष्मजीवांचे जीवन नांदते. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी वनांचा मोठा हातभार लागतो. हवामान बदलांशी जुळवून घेण्यातही वन परिसंस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. वनांमधून मानवाला अनेक प्रकारच्या वस्तू मिळतात. लाकूड, अन्नधान्य, रानमेवा, फळे, फुले, औषधी वनस्पती, चंदनासारख्या मौल्यवान वस्तू तसेच विविध प्रकारची नैसर्गिक साधनसंपत्ती वनातून मिळते. भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी वनांचे महत्त्व विशेष आहे.

**वन दिनाची पार्श्वभूमी**

संशोधनानुसार दरवर्षी जगात १३ दशलक्ष हेक्टरपेक्षा जास्त जंगलांचा नाश होत आहे. ही चिंताजनक बाब लक्षात घेऊन जनजागृती करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने २८ नोव्हेंबर २०१२ रोजी जागतिक वन दिन साजरा करण्याचा ठराव मंजूर केला. २१ मार्च २०१३ रोजी प्रथमच आंतरराष्ट्रीय वन दिन साजरा करण्यात आला. या दिवसाचा उद्देश म्हणजे जंगलांचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे, वनसंवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि जंगलांवर अवलंबून असलेल्या आदिवासी व इतर समाजघटकांच्या जीवनाकडे लक्ष वेधणे. जागतिक अन्न व कृषी संघटनेचाही या उपक्रमात मोलाचा वाटा आहे. संयुक्त राष्ट्रांनी या दिनासाठी शाश्वत वननिर्मिती आणि त्याचा योग्य वापर हे घोषवाक्य दिले आहे.

**भारतातील वनसंपदा**

पर्यावरण आणि वन मंत्रालयाने जाहीर केलेल्या भारत वनस्थिती अहवाल २०२१ नुसार भारताचे एकूण वनक्षेत्र ७,१३,७८९ चौरस किलोमीटर आहे. हे क्षेत्र देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २१.७२ टक्के इतके आहे. २०१९ च्या अहवालाच्या तुलनेत देशातील वनक्षेत्रात १५४० चौरस किलोमीटरने वाढ झाली आहे, तर वृक्षाच्छादित क्षेत्र ७२१ चौरस किलोमीटरने वाढले आहे.

महाराष्ट्रातही मोठी वनसंपदा आहे. ३,०७,७१३ चौरस किलोमीटर भौगोलिक क्षेत्रापैकी सुमारे ५०,७९८ चौरस किलोमीटर क्षेत्रावर वने आढळतात.

वन हे पृथ्वीचे फुफ्फुस मानले जाते. ते केवळ पर्यावरणाचे रक्षण करत नाहीत, तर मानवाच्या जीवनाला आधार देतात. त्यामुळे जंगलतोड थांबवणे, वृक्षलागवड करणे आणि वनांचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. जागतिक वन दिन हा फक्त एक दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नसून निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा आणि भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवेगार पृथ्वीचे रक्षण करण्याचा संदेश देणारा दिवस आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाकडून लोहयात मटका बुकीवर धाड तर पालममध्ये रेती वाहतुकीविरूद्ध कारवाई

नांदेड (प्रतिनिधी) –नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस अधिकारी व अंमलदारांचे एक पथक नांदेड व परभणी जिल्ह्यात रवाना केले होते. या पथकाने दि. १८ मार्च रोजी लोहा शहरातील छत्रपती शिवाजी चौक येथे एका शेडमध्ये मटका बुकीवर कारवाई करीत १७ आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ६२,६०० रुपयांची रोकड व ३ मोबाईल असा एकूण ९६,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यांच्याविरुध्द लोहा पोलीस ठाणे येथे गुरनं. ९२/२०२६ कलम १२ (अ), महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे. सदर आरोपी हे कल्याण मटका खेळत व खेळवीत होते. या कारवाईत लोहा नगरपरिषदेच्या एका नगरसेवकाचा समावेश असल्याचे स्पष्ट झाले आहे.



सदर प्रकरणाचा पुढील तपास लोहा पोलीस ठाण्यातील पोउपनि सी. जी. पांचाळ यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सदर पथकाने दि. १७ मार्च रोजी पालम पोलीस ठाण्याच्या हद्दीत पालम ते पेठपिंपळगाव रोडवरून अवैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्या हायवावर कारवाई करीत एक हायवा व चार ब्रास वाळू असा १० लाख, १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणात एका आरोपीस ताब्यात घेऊन त्याचेविरुद्ध पालम पोलीस ठाणे येथे गुरनं ११६/२०२६ कलम ३०३ (२), ३(५) भा.न्या. सं. सह कलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविला असून, या प्रकरणाचा तपास पालम पोलीस ठाण्यातील पोहेकॉ. शंकर कोलमवाड हे करीत आहेत.

उपरोक्त दोन्ही कारवायांत पथकाने एकूण ६२,६०० रुपयांची रोकड, ३ मोबाईल, १ हायवा व ४ ब्रास वाळू असा एकूण ११ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ. संजीव जिंकलवाड, पोकॉ. गणेश धुमाळ व पोकॉ. कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

‘खबर’ हेल्पलाईनचा वापर करा: आपल्या भागात चालणाऱ्या अवैध व्यवसायांची माहिती पोलिसांपर्यंत पोहोचविणे सोपे व्हावे म्हणून, पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली खबर नावाची हेल्पलाईन सुरू केली आहे. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेजद्वारे पाठवावी. माहिती देणाऱ्याची गोपनीयता ठेवण्यात येईल, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग निर्मूलनासाठी एचपीव्ही लसीकरण मोहिमेला गती द्या –मुख्य कार्यकारी अधिकारी



नांदेड (प्रतिनिधी) – मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य विभागा ची आढावा बैठक घेण्यात आली. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी एचपीव्ही लसीकरण ही काळाची गरज आहे. ही लस पूर्णपणे सुरक्षित असून पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आज आयोजित विशेष आढावा बैठकीत केले.

बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आरोग्य विभागाला लसीकरणाबाबत व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या. यामध्ये प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर भर देण्यात आला:

पालक–शिक्षक समन्वय: शाळा आणि शिक्षकांच्या मदतीने जास्तीत जास्त पात्र मुलींपर्यंत पोहोचून लसीकरणाचे प्रमाण वाढवणे.

**ग्रामस्तरावरील उपक्रम:** महिलांच्या विशेष ग्रामसभा, महिला मंडळ, युवा मंडळ आणि माता बैठकांचे आयोजन करणे.

**स्थानिक नेतृत्व:** गावातील सरपंचांच्या समन्वयाने जनजागृती करून पालकांना व लाभार्थ्यांना लस घेण्यासाठी प्रवृत्त करणे.

मुख्य कार्यकारी अधिकारी पुढे म्हणाले की, ही लस जागतिक आरोग्य संघटनेने प्रमाणित केलेली असून तिचे कोणतेही दुष्परिणाम नाहीत. लस घेतल्यास मुलींचे भविष्य आरोग्यदायी आणि उज्ज्वल होणार आहे. आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आयईसी उपक्रमांच्या माध्यमातून लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करावे.

या बैठकीत केवळ लसीकरणच नव्हे, तर इतर महत्त्वाच्या राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये: कुष्ठरोग आणि क्षयरोग निर्मूलन मोहीम. पॅलिएटिव्ह केअर (सुश्रुषा सेवा) गोल्डन कार्ड काढणे आणि आरसीएच संबंधित उपक्रम राबविणे.

या बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सलमा हिराणी, सह जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, सहसंचालक आरोग्य सेवा डॉ. बालन, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. शिवशक्ती पवार, मलेरिया अधिकारी डॉ. चव्हाण, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी श्रीमती रेणुका दराडे यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनवटमध्ये ४.७५ लाखांचा गुटखा जप्त



किनवट (प्रतिनिधी)– तालुक्यातील धानोरा येथून किनवट पोलिसांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत गुरुवार, दि. १९ मार्च रोजी सकाळी कारवाई केली. या कारवाईत ४ लाख ७२ हजार ४८० रुपयांचा विविध कंपन्यांचा गुटखा, तंबाखू पुड्यांसह बोलेरो मालवाहू वाहन जप्त केले.

किनवट तालुक्यातील धानोरा येथून सरकारने बंदी घातलेल्या गुटख्याची वाहतूक, तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती किनवट पोलिसांना मिळाली. या प्रकरणाची माहितही जिल्हा पोलीस अधीक्षकांसह इतर पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आली. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक गणेश कराड, फौजदार सागर झाडे, पोलीस कर्मचारी आत्राम, डुकरे, अन्नेलवार, कुडमेथे यांनी धानोरा गावात छापा टाकला. या छाप्यात बोलेरो पिकअप व्हॅनमध्ये राजनिवास मसाला, गोवा, विमल, अनार पान आदी विविध कंपन्यांचा ४ लाख ७२ हजार ४८० रुपयांचा गुटखा व ५ लाख रुपये किमतीचे बोलेरो वाहन क्र. एम. एच. २६ – बीसी १००६ जप्त केले.

याप्रकरणी फौजदार झाडे यांच्या तक्रारीवरून वाहिद माजीद मोमीन रा. धानोरा व अमेर सय्यद खमर रा. हिमायतनगर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# ॲथलेटिक्स, कुस्ती खेळासाठी खेळाडूंची निवड; पात्र खेळाडुंना अर्ज करण्याचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी) –राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी मिशन लक्षवेध हा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या योजनेंतर्गत लातूर विभागास ॲथलेटिक्स व कुस्ती या दोन खेळांचे निवासी विभागीय क्रीडा निपुणता केंद्र सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. या विभागीय क्रीडा निपुणता केंद्र अंतर्गत ॲथलेटिक्स व कुस्ती या खेळांच्या प्रत्येकी २० खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. यासाठी पात्र खेळाडूंनी आपले अर्ज विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा लातूर विभाग जिल्हा क्रीडा संकुल परिसर औसा रोड लातूर येथे प्रत्यक्ष अथवा dyd.syslaturrediffmail.com या मेलवर शुक्रवार, दि. २० मार्च २०२६ पर्यंत करावे, असे आवाहन लातूर विभागाचे क्रीडा व युवक सेवा उपसंचालक महादेव कसगावडे यांनी केले आहे.

**आवश्यक कागदपत्रे व पात्रता**

**वयोमर्यादा–** २५ वर्षाआतील मुले, मुली (वर्षाच्या ३१ डिसेंबर २०२६ रोजी).

**आवश्यक कागदपत्रे** –जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, मागील २ वर्षातील क्रीडाविषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज ३ फोटोग्राफ, शाळा, महाविद्यालय बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकांचे संमती पत्र इ.

**अधिवास** –महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असणे आवश्यक (अधिवास प्रमाणपत्र).

**क्रीडा कामगिरी** –राज्य स्तरावरील पदक प्राप्त खेळाडू किंवा राष्ट्रीय स्तरावरील सहभागी (SGFI, FI, Khelo India National only) गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मूल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती चाचन्यांमध्ये पात्र होणे आवश्यक.

**वैद्यकीय तपासणी** –शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य.

निवड झालेल्या खेळाडूंना निवासी क्रीडा प्रशिक्षण, पायाभूत सुविधा व क्रीडा साहित्य, खेळाडूंचा सराव व मूल्यांकनाकरिता क्रीडा स्पर्धेचे आयोजन स्पोर्ट्स सायन्स सेंटर, करीयर मार्गदर्शन, देशी–विदेशी संस्थांच्या सहकार्याने क्षमता विकास कार्यक्रम इ. सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मिशन लक्षवेध ही निवासी विभागीय क्रीडा निपुणता योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

# मंगळवारी नायगाव येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

नांदेड(प्रतिनिधी)–जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व परमवीर चक्र कॅप्टन गुरबचन सिंग सलारिया शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नायगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार २४ मार्च २०२६ रोजी परमवीर चक्र कॅप्टन गुरबचन सिंग सलारिया शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नायगाव येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्लेसमेंट ड्राईव्ह /रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधी साठी मुलाखती घेण्यात येणार असून जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी मंगळवार २४ मार्च २०२६ सकाळी १० वा. पासून परमवीर चक्र कॅप्टन गुरबचन सिंग सलारिया शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नायगाव येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे.

# कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षपदी उत्तम खंदारे



अर्धापूर (प्रतिनिधी) – कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, समाजकल्याण, महिला बालविकास, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी उत्तम खंदारे यांची निवड करण्यात आली आहे.

कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, समाज कल्याण आयुक्तालय अध्यक्ष श्रीमती शालिनी भूषण दगडे यांनी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, समाजकल्याण, महिला बालविकास, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाच्या उपाध्यक्षपदी उत्तम खंदारे यांची निवड करण्यात आली आहे. खंदारे यांना नुकतेच नियुक्तपत्र दिले आहे. उपाध्यक्षपदी उत्तम खंदारे यांची निवड झाल्याबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# आर्य वैश्य महिलामंडळाच्या वतीने तीन दिवसीय कडूलिंब सालामृत व रस सेवनाचे आयोजन

हदगाव (प्रतिनिधी)– येथील आर्य वैश्य महिला मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त व्याधीमुक्त निरामय आरोग्यासाठी किशोर बनगिनवार दिग्रस यांचे कडुलिंब सालामृत व रस प्राशनाचे तीन दिवसीय शिबीर २१ ते २३ मार्च दरम्यान आयोजित केले आहे.

कडुलिंबाच्या झाडाला आयुर्वेदात अत्यंत महत्त्व असून, पाडव्यास नवीन मोहोर आलेल्या कडुलिंबाचे औषधीयुक्त गुण अधिक परिणामकारक होत असल्याने संपूर्ण चैत्र महिन्यात अनेक नागरिक कडुलिंबाच्या अंतर सालीच्या रसाचे किंवा पाल्याच्या रसाचे सेवन करतात.



शरीरातील अनेक व्याधीवर गुणकारी असलेल्या कडुलिंबाच्या आंतरसालीच्या रसाचे सेवन दिग्रस येथील ८० वर्षीय कृषी व्यावसायिक किशोर बनगिनवार हे मागील ४५ वर्षांपासून करीत आहेत. त्यांना त्यापासून फायदा म्हणजे ते निरोगी जीवन जगत आहेत. त्यांच्या या अनुभवाचा फायदा जास्तीत जास्त नागरिकांना व्हावा या उद्दात हेतूने ते मागील बारा वर्षांपासून या शिबिराचे आयोजन करीत आहेत. २१ मार्च ते २३ मार्चपर्यंत सतत तीन दिवस हनुमान मंदिर कोर्टाजवळ सकाळी ६.३० ते ७ .३० वाजता कडुलिंबाच्या आंतरसालीचे साल प्राशन शिबीर आयोजित केले आहे.

या शिबिराचा लाभ शहरातील सर्व नागरिकांनी घेण्याचे आवाहन आर्य वैश्य महिला मंडळाने केले आहे. कडूलिंब सालामृत मातृप्रस्थल्याची थोडक्यात माहिती देण्यात येणार आहे. तेव्हा परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आर्य वैश्य समाज महिला मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत श्रमसंस्कार शिबीर संपन्न

नांदेड (प्रतिनिधी) –श्री गुरू गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदेड येथे राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत आयोजित विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर ११ ते १६ मार्च २०२६ या कालावधीत उत्साहात पार पडले.

या शिबिरादरम्यान ग्रामस्वच्छता, रस्ते दुरुस्ती, साक्षरतेचे महत्त्व, आरोग्य शिबीर, वृक्षारोपण, पेंटिंग, वायरिंग, नळकाम तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात प्रशिक्षणार्थी व ग्रामस्थांना विविध विषयांवर मार्गदर्शन मिळावे यासाठी तज्ज्ञ व्यक्तींना आमंत्रित करण्यात आले होते. राष्टसंत गुरुवर्य सतगुरू साईनाथ महाराज स्वच्छता दूत यांनी स्वच्छतेविषयी प्रबोधन केले.




समारोप कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून अर्धापूरचे तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांची यांची उपस्थिती होती.

यावेळी तहसीलदार देवणीकर यांनी सांगितले की, या उपक्रमांमुळे व्यक्तिमत्त्व विकास घडतो व समाजाप्रती असलेली बांधीलकी दृढ होते. तसेच प्रशिक्षणार्थ्यांनी नोकरीपेक्षा स्वतःचे उद्योग सुरू करण्यावर भर द्यावा, असे आवाहन करून त्यांचे मनोबल वाढवले.

संस्थेचे उपप्राचार्य व्ही. डी. कंदलवाड यांनी महादेव पिंपळगाव येथील ग्रामस्थांचे सहकार्याबद्दल आभार मानले. तसेच प्रशिक्षणार्थी व कर्मचाऱ्यांनी शिबिर यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. शिबिराच्या निरोप समारंभाला गावातील सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच, मंगल कार्यालयाचे अध्यक्ष, ग्रामस्थ, शिल्पनिदेशक व शिबिरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘टॉक्सिक गॅस मॉनिटरिंग वेअरेबल डिव्हाईस’ संशोधनास पेटंट

माहूर (प्रतिनिधी)– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी विकसित केलेल्या टॉक्सिक गॅस मॉनिटरिंग वेअरेबल डिव्हाइस या संशोधनाला भारतीय डिझाइन पेटंट प्राप्त झाले आहे. औद्योगिक सुरक्षा आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वपूर्ण मानले जात आहे.



प्रा. राजाराम माने, डॉ. संतोष जाधव, डॉ. रवी कावळे, डॉ. श्याम गोरे यांच्या नेतृत्वाखाली प्रा. अविनाश गायकवाड, प्रा. विजयपाल वाढवे, प्रा. प्रतीक राऊत आणि संशोधक विद्यार्थी ऋषिकेश सूर्यवंशी या गटाने हे वेअरेबल डिव्हाइस विकसित केले आहे.

हे उपकरण कार्बन मोनॉक्साइड, हायड्रोजन सल्फाइड, सल्फरडायऑक्साइड यांसारख्या विषारी वायूंची उपस्थिती त्वरित ओळखण्यासाठी तयार करण्यात आले आहे. परिसरात अशा वायूंचे प्रमाण वाढल्यास हे डिव्हाइस तत्काळ अलार्म देऊन व्यक्तीला सावध करते. तसेच मोबाइल ॲपद्वारे सूचना पाठवण्याची सुविधाही उपलब्ध आहे. त्यामुळे औद्योगिक कामगार, खाण कामगार, रासायनिक उद्योगातील कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान तसेच प्रदूषणग्रस्त भागातील नागरिकांसाठी हे उपकरण अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या संशोधन गटातील प्रा. विजयपाल वाढवे हे श्रीक्षेत्र माहूर येथील श्री रेणुकादेवी महाविद्यालयात भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या सहभागातून मिळालेले हे सांघिक स्वरूपातील दुसरे पेटंट असून यापूर्वी महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या नावे दोन वैयक्तिक व एक सांघिक अशा एकूण तीन पेटंट प्राप्त केले आहे.

# नांदेड जिल्हा कृषी व धान्य महोत्सवात विक्रमी उलाढाल

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड आणि प्रकल्प संचालक, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ते १७ मार्च २०२६ या कालावधीत जिल्हास्तरीय कृषी व धान्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, हरिद्रा, रेशीम, मत्स्य विभाग, आणि शेतकरी, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी सक्रीय सहभाग घेतला. तसेच शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला थेट बाजारपेठ मिळावी आणि ग्राहकांना दर्जेदार शेतीमाल उपलब्ध व्हावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या ‘जिल्हा कृषी व धान्य महोत्सव २०२६’ ला नांदेड जिल्ह्यातील व शहरातील जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवा मोंढा मैदानात रंगलेल्या या तीन दिवसीय महोत्सवात तब्बल १ कोटी रुपयांपेक्षा अधिक विक्रमी उलाढाल झाली असून, यामुळे शेतकऱ्यांच्या दर्जेदार उत्पादनास नागरिकांनी मोठ्या प्रमाणात पसंती मिळाली व शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळाला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये व नागरिकांमध्ये आनंदाची भावना दिसून आली. तसेच जिल्हा महोत्सव अतर्गत खरेदीदार विक्रेता संमेलनात ५५ लक्ष रुपये किमतीचे खरेदी करार करण्यात आले.

या महोत्सवाच्या तिन्ही दिवसांत ग्राहकांनी खरेदीसाठी उत्स्फुर्त सहभाग घेतल्यामुळे मध्यस्थांशिवाय थेट ग्राहकांना विक्री करण्यात आली आहे.शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल उत्पादनास योग्य मोबदला मिळाला आहे. विविध प्रकारचे धान्य, कडधान्ये आणि प्रक्रियायुक्त पदार्थांचे स्टॉल्स, पाणलोट, जलतारा, नैसर्गिक शेतीचे मॉडेल तसेच ईलेक्ट्रीक पॉवर टिलर ठरले कृषी महोत्सवाचे आकर्षण.

पौष्टिक तृणधान्य, पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत बाजरी, राजगिरा, नाचणी, वरई, भगर यांसारख्या पौष्टिक तृणधान्यांपासून तयार केलेले विविध पदार्थ स्पर्धकांनी सादर केले. या स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. सुरेखा कुलकर्णी व प्रा. अलका पवळे यांनी केले. प्रथम क्र. सौ. सुनीता अशोक कावळे, रेनापूर, ता. भोकर (नाचणी व भगर लाडू) द्वितीय क्रमांक सौ. मनीषा सुरेशराव कदम, नांदेड (भगर आप्पे व इडली) तृतीय क्रमांक सौ. अर्चना विजय क्षीरसागर, नांदेड (नाचणी ढोकळा) तसेच सर्व विजेत्यांना व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. प्रथम क्र. सौ. सुनीता अशोक कावळे, द्वितीय क्र.सौ. मनीषा सुरेशराव कदम, तृतीय क्र. सौ. अर्चना विजय क्षीरसागर, नांदेड तसेच सर्व विजेत्यांना व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. तसेच बायोचार, ऊसा पिकातील तंत्रज्ञान मार्गदर्शन व शेतकरी शास्त्रज्ञ कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या महोत्सवाच्या यशस्वीतेमुळे आगामी काळात अशा उपक्रमांची व्याप्ती वाढवण्याचा मानस शेतकऱ्यांनी व नागरिकांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांचे हिताचे असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांच्या ई–पीक पाहणीसाठी मुदतवाढ

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांची ई–पीक पाहणी अद्याप झाली नाही अशा सर्व शेतकऱ्यांनी तत्काळ आपले गावासाठी नेमलेले सहायक अथवा ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी संपर्क साधून मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ पूर्वी ई–पीक पाहणी पूर्ण करावी, असे आवाहन नांदेड जिल्हा प्रशासनाने केले आहे.

पीक नोंदणी न झाल्याने नैसर्गिक आपत्ती, पीक विमा, पीक कर्ज इत्यादी लाभांपासून कोणताही शेतकरी वंचित राहू नये. तसेच नाफेडमार्फत खरेदीसाठी अडचणी येऊ नये याकरिता सहायक स्तरावरून करावयाच्या पीक नोंदणीला (DCS) ३१ मार्च २०२६ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या कालावधीत उर्वरित सर्व शेतकऱ्यांची पीक पाहणी पूर्ण करून घेण्याबाबत सर्व संबंधितांनी तत्काळ कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी दिले आहेत.

कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध–व्यवसाय विकास व मत्स्य–व्यवसाय विभागाचा शासन निर्णय १४ ऑक्टोबर २०२४ नुसार संपूर्ण राज्यामध्ये ई–पीक पाहणी अंतर्गत मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदणी करण्यात येते. राज्यात रब्बी हंगाम २०२५–२०२६ हा १० डिसेंबर २०२५ पासून सुरु असून त्याअंतर्गत १० डिसेंबर २०२५ ते २४ जानेवारी २०२६ या कालावधीत शेतकरी स्तरावरून पीक नोंदणी ही सुरु होती. तसेच २५ जानेवारी २०२६ पासून सहायक स्तरावरून ई–पीक पाहणी नोंदणी करण्यात आली असून त्याची अंतिम मुदत १० मार्च, २०२६ अशी होती.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# स्मार्टफोनवरील एक सेटिंग तुमचे बँक खाते करू शकते रिकामे!






**आजकाल APK स्कॅमची भीती सर्वत्र पसरलेली आहे. सायबर गुन्हेगार विविध मार्गांनी लोकांच्या फोनवर APK फाईल्स इन्स्टॉल करून त्यांची बँक खाती रिकामी करण्याचा प्रयत्न करत आहेत. हे करण्यासाठी ऑनलाइन फसवणूक करणारे एलपीजी गॅस सिलिंडरच्या तुटवड्यापासून ते वाहनांवरील दंडाच्या खोट्या पावत्यासुद्धा पाठवतात. फार कमी लोकांना हे माहीत आहे की, फोनमधील फक्त एक सेटिंग तुम्हाला कोणत्याही प्रकारच्या APK घोटाळ्यापासून वाचवू शकते.**

APK घोटाळा करण्यासाठी फसवणूक करणाऱ्याला वापरकर्त्याच्या फोनवर APK फाईलद्वारे आपले सॉफ्टवेअर इन्स्टॉल करावे लागते. यालाच साइडलोडिंग असेही म्हणतात, म्हणजेच गूगल प्ले स्टोअर व्यतिरिक्त इतर स्त्रोतावरून ॲप किंवा सॉफ्टवेअर इन्स्टॉल करणे. कोणतेही ॲप साइडलोड करण्यासाठी, तुमच्या फोनच्या सेटिंग्जने त्याला परवानगी दिली पाहिजे. जर 'अननोन सोर्स' (Unknown Sources) सेटिंग बंद असेल, तर कोणी कितीही प्रयत्न केला तरी साइडलोडिंग करणे अशक्य होईल. जेव्हा एखादा फसवणूक करणारा APK घोटाळ्यासाठी कोणाला लक्ष्य करतो, तेव्हा तो प्रथम त्यांना 'अननोन सोर्स' सेटिंग चालू करण्यास सांगतो. याचा अर्थ असा की, 'अननोन सोर्स' सेटिंग चालू केल्याशिवाय कोणीही तुमच्या फोनवर APK फाईल्स इन्स्टॉल करू शकत नाही. म्हणून, ही सेटिंग बंद करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## 'अननोन सोर्स सेटिंग' म्हणजे काय?

तुम्ही याला एक सुरक्षा सेटिंग समजू शकता. नावाप्रमाणेच, हे सेटिंग चालू केल्याने तुमच्या फोनवर अननोन सोर्सकडून ॲप्स किंवा सॉफ्टवेअर इंस्टॉल करण्याचा मार्ग मोकळा होतो. जोपर्यंत हे सेटिंग बंद आहे, तोपर्यंत तुम्ही गूगल प्ले स्टोअर व्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणाहून कोणतेही ॲप्स किंवा सॉफ्टवेअर इंस्टॉल करू शकत नाही. कधीकधी, लोक पैसे देऊन विकत घेतलेल्या ॲप्स किंवा गेम्सच्या क्रॅक केलेल्या आवृत्त्या (cracked versions) इंस्टॉल करण्यासाठी हे सेटिंग चालू करतात, जे धोकादायक असू शकते. हे सेटिंग चालू केल्याने तुमचा फोन संशयास्पद सॉफ्टवेअर आणि ॲप्ससाठी खुला होतो.

## अननोन सोर्स सेटिंग बंद असल्यास काय होते?

जेव्हा तुमच्या फोनमधील अज्ञात स्त्रोत सेटिंग बंद असते आणि कोणी तुम्हाला APK फाईल इंस्टॉल करण्यास सांगते, तेव्हा फोन तुम्हाला ते चालू करायचे आहे का असे विचारतो. याचा अर्थ असा की, जरी तुम्ही एखाद्या स्कॅमरच्या फसवणुकीला बळी पडून APK फाईल इंस्टॉल केली, तरी जोपर्यंत अननोन सोर्स सेटिंग तुम्ही चालू करत नाही तोपर्यंत तुमचा फोन ती इंस्टॉल करू देणार नाही. जर तुम्हाला कधीही कोणत्याही बहाण्याने हे सेटिंग चालू करण्यास सांगितले गेले, तर तसे करू नका आणि सापळ्यात अडकण्यापासून सावध रहा.

## कोणते स्मार्टफोन धोक्यात आहेत?

साइडलोडिंग म्हणजेच गूगल प्ले स्टोअर व्यतिरिक्त इतर स्त्रोतांकडून ॲप्स किंवा सॉफ्टवेअर इंस्टॉल करण्याचा पर्याय फक्त अँड्रॉइड स्मार्टफोनवर उपलब्ध आहे. युरोपियन युनियन वगळता इतर कोठेही आयफोनवर हा पर्याय उपलब्ध नाही, त्यामुळे आयफोन वापरकर्ते APK घोटाळ्यांपासून मोठ्या प्रमाणात सुरक्षित आहेत. तथापि, जर तुम्ही अँड्रॉइड वापरकर्ते असाल, तर हे सेटिंग तपासा आणि ताबडतोब बंद करा.

# काय आहे होलोग्राम तंत्रज्ञान?

## ज्यामुळे सिद्धू मूसेवालाची कामगिरी मंचावर दाखवता येईल?

**लोकप्रिय गायक सिद्धू मूसेवालाचा त्याच्या मृत्यूनंतर होलोग्राम आधारित जागतिक दौरा होणार आहे. 'साईन्ड टू गॉड वर्ल्ड टूर' नावाचा एक टीझरही प्रदर्शित करण्यात आला आहे. या दौऱ्यात सिद्धू मूसेवाला होलोग्राम तंत्रज्ञानाचा वापर करून मंचावर दिसतील. हे लक्षात घेण्यासारखे आहे की २०२२ मध्ये सिद्धू मूसेवाला यांची हत्या झाली होती. होलोग्राम तंत्रज्ञानामुळे असे वाटेल की जणू सिद्धू मूसेवाला स्वतःच मंचावर सादरीकरण करत आहेत.**



होलोग्राम तंत्रज्ञान हे एक ३ डी तंत्रज्ञान आहे, जे लेझर लाईट आणि कॅमेऱ्यांचा वापर करून कोणत्याही व्यक्तीची किंवा वस्तूची वास्तववादी प्रतिमा हवेत प्रक्षेपित करते. सोप्या भाषेत सांगायचे तर, यामुळे तुम्हाला पडद्याशिवाय हवेत फिरणाऱ्या लोकांच्या किंवा वस्तूंच्या प्रतिमा आणि व्हिडिओ पाहता येतात. यामुळे असे वाटते की ती व्यक्ती किंवा वस्तू प्रत्यक्षात तिथे आहे.

## होलोग्राम तंत्रज्ञान म्हणजे काय?

होलोग्राम तंत्रज्ञान हे एक असे तंत्रज्ञान आहे जे पडद्याशिवाय फोटो किंवा व्हिडिओ हवेत प्रक्षेपित करण्याची परवानगी देते. यामध्ये, लेझर लाईट्सच्या मदतीने फोटो किंवा व्हिडिओ हवेतून फिरत असल्याचे दिसते. या तंत्रज्ञानाचा वापर सिद्धू मुसेवालाच्या बाबतीतही केला जाईल. हे लक्षात घेण्यासारखे आहे की ही प्रतिमा सामान्य फोटो किंवा व्हिडिओपेक्षा लक्षणीयरीत्या वेगळी असते, कारण ती २ डी ऐवजी ३ डीमध्ये दिसते. ज्यामुळे होलोग्राममध्ये दर्शविलेली व्यक्ती किंवा वस्तू अधिक वास्तववादी दिसते.

## होलोग्रामचा वापर कुठे केला जातो?

मनोरंजन आणि थेट कार्यक्रमांव्यतिरिक्त, होलोग्रामचा वापर होलोग्राफिक शिक्के म्हणूनही केला जातो. त्याची नक्कल करणे जवळजवळ अशक्य आहे, त्यामुळे त्याचा वापर अनेकदा मूळ उत्पादने, जसे की बॉक्स किंवा क्रेडिट आणि डेबिट कार्ड ओळखण्यासाठी केला जातो. विद्यार्थ्यांना 3D मॉडेल्स दाखवून क्लिष्ट विषय समजावून सांगण्यासाठी देखील होलोग्राम तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. सैन्यामध्ये, शत्रूच्या प्रदेशाचे 3D नकाशे तयार करण्यासाठी याचा वापर केला जातो, ज्यांना टेरेन मॅप्स (भूभागाचे नकाशे) असेही म्हटले जाते.




## होलोग्राम तंत्रज्ञान कसे कार्य करते?

होलोग्राम तंत्रज्ञान अतिशय मनोरंजक पद्धतीने कार्य करते. यात एका शक्तिशाली लेझर बीमचा वापर केला जातो, जो विशेष उपकरणांच्या



साहाय्याने दोन भागांमध्ये विभागला जातो. पहिला रेफरन्स बीम थेट रेकॉर्डिंग उपकरणावर पडतो, तर दुसरा ऑब्जेक्ट बीम कलाकार किंवा दर्शविल्या जाणाऱ्या वस्तूवर निर्देशित केला जातो. जेव्हा हे दोन्ही बीम एकमेकांवर आदळतात, तेव्हा प्रकाशाचा एक नमुना तयार होतो जो डिजिटल स्वरुपात रेकॉर्ड केला जातो. या रेकॉर्ड केलेल्या डेटाला होलोग्राम म्हणतात. लाइव्ह कॉन्सर्ट दरम्यान, हा रेकॉर्ड केलेला नमुना हाय-टेक प्रोजेक्टर वापरून स्टेजवर प्रक्षेपित केला जातो. जेव्हा प्रोजेक्टरचा प्रकाश हवेत तरंगणाऱ्या अदृश्य पडद्यावर किंवा फॉइलवर पडतो, तेव्हा प्रेक्षकांना असे वाटते की जणू एखादी जिवंत व्यक्ती तिथे उपस्थित आहे. प्रत्यक्ष सादरीकरणात मृत कलाकारांचे चित्रण करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर बऱ्याच काळापासून केला जात आहे. होलोग्राम तंत्रज्ञानाचा वापर यापूर्वी टुपॅक शकूर, व्हिटनी ह्यूस्टन, मायकल जॅक्सन, रॉय ऑर्बिसन आणि फ्रँक झप्पा यांच्यासह इतरांनी त्यांच्या संगीत मैफिलींमध्ये केला आहे.

# अजब-गजब

## चॅरिटीकरिता कटवले 3 फूट लांब केस

**लंडन :** केसांवर प्रेम नसणारी महिला किंवा मुलगी शोधून सापडणार नाही. आजकाल फॅशनच्या नावाखाली मुली केसांवर कात्री फिरविण्यास कमी करत नाहीत. पण त्यांचे केस फारसे वाढलेले नसतात. म्हणून हे केस गमाविण्याचे कोणतेही दुःख त्यांना होत नाही. हेच केस दीड- दोन फुटांहूनही जास्त असले तर मात्र कापणे तर दूरच, पण त्यांची योग्य निगा राखण्यासाठी धडपड सुरू होते. एका मुलीने मात्र सामाजिक कार्यात हातभार लागावा म्हणून आपले ३ फूट केस कापले. गेल्या ११ वर्षांपासून तिने हे केस वाढवले होते. आर्टमिस पॅटरसन असे या मुलीचे नाव आहे. आर्टमिसने सांगितले, की केसांचा कॅन्सर आणि एलोपेसियासारखा आजार झालेल्या व्यक्तींसाठी माझ्या केसांपासून विग बनविण्यात येतील. अनेक जण हेअर लॉससारख्या समस्यांशी झुंजत आहेत, हे कळल्यावर तिच्या मनात परिवर्तन घडून आले आणि तिने आपल्या मित्र, शिक्षक आणि कुटुंब सदस्यांसमोर शाळेच्या प्रांगणात आपले केस कापून घेतले. हे केस एका सामाजिक संस्थेला दान करण्यात आले. आता या तीन फुटांच्या केसांपासून किती जणींचे विग बनतील, याचा विचार करा.

## आलू विक्रेत्याला जडलाय कार जमा करण्याचा छंद!

**लंडन : ब्रिटनच्या एका आलू विक्रेत्याने चक्क कारचा संग्रह केला आहे. त्याच्या संग्रहात तब्बल २७ कार आहेत. कारही कोणत्या आहेत माहितेय..? कधी काळी राजे-महाराजे आणि सत्ताधाऱ्यांची पसंत असलेल्या हम्बर कार! आजघडीला हम्बर कार बघायलाही मिळत नाही. १९७६ मध्ये ही कार बनविणारी कंपनी बंद झाली होती.**



एकेकाळी रोल्स रॉयस कारांच्या तुलनेत हम्बरची विक्री कायम जास्त असायची. आज रोल्स रॉयस कार रस्त्यावर दिसतात पण हम्बर शोधूनही सापडत नाही. त्यामुळे या आलू विक्रेत्याच्या संग्रहाबाबत सर्वांनाच आश्चर्य आहे. एलन मार्शल असे या ५५ वर्षीय आलू विक्रेत्याचे नाव असून ते ब्रिटनच्या हल शहरात राहतात. ५१ वर्षांपूर्वी त्यांच्या पित्याने ९० पाऊंडमध्ये पहिली हम्बर कार खरेदी केली होती. लहानाचे मोठे होत असताना एलन याच कारमध्ये फिरले. त्यामुळे त्यांना या कारचे आकर्षण होते. जुन्या हम्बर कार आपल्या संग्रही असाव्या म्हणून त्यांनी अशा कार शोधून विकत घेण्याचे ठरवले. त्यांच्या प्रयत्नाला यश मिळत गेले आणि आजघडीला २७ कार त्यांच्या दारात उभ्या आहेत. त्यांच्याकडे असलेल्या प्रत्येक कारची किंमत आता किमान पाच ते सहा लाख रुपये झाली आहे. पण या कार कधीही विकणार नसल्याचे एलन सांगतात. त्यांच्याकडील संग्रह पाहण्यासाठी पैसेही लागत नाहीत. ते लग्नासाठी आपल्या कार भाड्याने देत असतात. लोकही शान मिरविण्यासाठी लग्नात आवर्जून हम्बर कार आणतात. कारचे नुकसान होण्याच्या भीतीने एलन यांनी आतापर्यंत कोणत्याही चित्रपटाच्या शूटिंगसाठी आपल्या कार दिल्या नाहीत. यावरून त्यांच्या कारवरील प्रेमाची प्रचिती येते.

## 92 वर्षीय वृद्धेवर पतीला ठार मारल्याचा खटला

**मेलबर्न :** ऑस्ट्रेलियातील एका ९२ वर्षीय वृद्धेवर पतीला ठार मारल्याचा खटला चालवला जाणार असून, ऑस्ट्रेलियातील ती सर्वांत वयोवृद्ध खुनी महिला ठरणार आहे. तिला कायम संशय असायचा की पती तिला जेवणात विष घालून ठार मारेल. संशयापोटीच तिने पतीला यमसदनी पाठवले.



सिडनी मॉर्निंग हेराल्ड दैनिकात आलेल्या बातमीत म्हटले आहे, की क्लारा ताग नावाच्या या महिलेने आपल्या ९८ वर्षीय पती चिंग युंगची गेल्या ११ मार्चला हत्या केली. त्यांच्या ७० वर्षांच्या संसाराचा अशा प्रकारे अंत होईल, ही कल्पनाही कुणी केली नव्हती. वृद्ध महिला मानसिकरित्या आजार असल्याचा अहवाल डॉक्टरांनी दिला आहे. पण पोलिसांनी वृद्धेच्या विरोधात सबळ पुरावे जमा केल्याने तिने थंड डोक्याने पतीचा खून केल्याचेच दिसून येत आहे. ३० वर्षांपूर्वी हे दाम्पत्य शांघाय येथून सिडनीला आले होते. पतीच्या पोटात दोनदा चाकू मारून डोक्यावरही तिने अंधाधुंद वार केले होते. त्यामुळे पती जागीच ठार झाला होता. नंतर स्वतःच्या चुकीची जाणीव झाल्याने तिने पोलिसांना फोन करून बोलावून घेतले. पोलीस आले तेव्हा पूर्णपणे रक्तात माखलेली वृद्धा पाहून तेही काही क्षण बिथरले होते. क्लाराचे वय बघता आतापर्यंत पोलिसांनी तिच्यावर दयाच दाखविली आहे. त्यामुळे पोलीस कोठडी मिळालेली असूनही त्यांनी तिला नर्सिंग होममध्ये उपचारासाठी ठेवले आहे.

## अबब... 15 किलोंचे बिस्किट!




**लंडन :** न्यूझिलंडच्या दोन युवकांनी इतके मोठे बिस्किट बनवले आहे की ते चहात बुडवून खाणे अशक्य आहे. त्यांनी जगातील सर्वांत मोठे बिस्किट बनवण्याचा विक्रम केला आहे.

५९ सेंटीमीटर लांब आणि ३९ सेंटीमीटर आडवे हे विशाल बिस्किट १५.७३ किलो वजनाचे आहे. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये सर्वांत मोठे बिस्किट म्हणून त्याची नोंद झाली आहे. बिस्किट बनवणाऱ्या सिमोन मॉर्गन आणि पॉल थॅकर या जोडगळीला यासाठी साडेअकरा तास अथक मेहनत करावी लागली. गिनीज बुकात विक्रम नोंदवल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले, की आम्हा दोघांचीही काहीतरी वेगळे करून दाखविण्याची इच्छा होती. या इच्छेमुळेच आम्ही हे बिस्किट बनवले. बिस्किट प्रत्यक्षात साकारल्यानंतर आम्हाला आमचे स्वप्न पूर्ण झाल्याचे समाधान मिळाले, असे ते म्हणाले. सिमोन आणि पॉल दोघेही अजून शिकताहेत.

# अनाथांचा नाथ..!

## 9 मुले दत्तक घेऊन सांभाळतोय!

**लंडन : काही जणांचे हृदय फार मोठे असते... त्यांच्या हृदयात कायम दुसऱ्याविषयी आपुलकी, प्रेम, दयाभाव असतो. असे लोक दुसऱ्याच्या भल्याचाच विचार करतात, त्यांच्या या स्वभावामुळे तेही कधी दुःखी राहत नाहीत... यापैकीच एक उदाहरण आहेत ब्रिटनमधील चार्टर्ड अकाऊंटंट जिम क्लिफोर्ड. त्यांचा पगार सहा आकडी आहे. पण तरीही महिन्याच्या शेवटी खिशात दमडीही उरत नाही. याचे कारण त्यांचा स्वभाव आहे!**



पश्चिम लंडनमध्ये जिम पत्नी सिऊसोबत सात खोल्यांच्या घरात राहतात. सात खोल्यांचे घर असूनही त्यांची कार उभी राहील, एवढी जागा घर आणि परिसरात उरलेली नाही. याचे कारण काय आहे माहितेय..? त्यांची अपत्येच इतकी आहेत, की त्यांच्या गाड्या, सायकली उभ्या केल्यानंतर जिम यांच्या कारला जागाही उरत नाही. जिम यांनी ९ अनाथ मुले दत्तक घेतली आहेत. त्या सर्वांसह जिम या घरात राहतो. जिम यांची पत्नी सिऊ हिने पत्रकारांना सांगितले, की जिम यांना नेहमीच मोठे कुटुंब आवडत आले आहे. त्यांचे नियोजन आधी चार मुलांचे होते. दोन स्वतःचे झाल्यानंतर दोन मुले दत्तक घ्यायचे, असे त्यांनी ठरवले होते. पण निसर्गाच्या मनात काही वेगळेच होते. निसर्गाने त्यांना स्वतःचे एकही अपत्य होऊ दिले नाही. त्यामुळे जिम यांनी आधी चार आणि नंतर पुन्हा पाच अनाथ मुले दत्तक घेतली. यातील सर्वच मुले आता मोठी झाली आहेत. काहींचे लग्न करण्याची वेळ आली आहे. यात ३० वर्षीय लिसा, २७ वर्षीय जस्टिन, २५ वर्षीय क्रिस, २३ वर्षीय वाएने यांचा समावेश आहे. तर १७ वर्षीय डिवॉन, १३ वर्षीय कर्टनी, ११ वर्षीय कैल, १० वर्षीय लेविस हे अजून लहान आहेत. पाच मुली आणि चार मुलांचा त्यांचा सुखी संसार कायम सर्वांच्या चर्चेत राहिला आहे. जिम यांनी इतके दयाळू होण्याचे कारणही तसेच आहे. १९६१ मध्ये जिम यांच्या अल्पवयीन आईने त्यांना अनाथालयात सोडले होते. तेथून एका कुटुंबाने त्यांना दत्तक घेतले होते. त्यांनी कधीही जिमला अनाथ असल्याची जाणीव होऊ दिली नाही. त्यांच्यामुळे जिम यांच्यावर चांगले संस्कार घडले. १९८४ मध्ये जिम यांची सिऊशी भेट झाली. सिऊही अनाथच. त्यामुळे तिच्याशी लग्न करून जिम यांनी पहिल्या अनाथ मुलीला आधार दिला. नंतरच्या काळात डॉक्टरांनी त्यांना मूल होणार नसल्याचे सांगितले आणि मग ९ अनाथांचा नाथ होण्याचे भाग्य जिमला लाभले. दैवाने मारले असले तरी जिमने त्यांना तारले, असेच म्हणावे लागेल.

# उत्पन्नाच्या तुलनेत 'एसटी'ला दररोज २ कोटींचा तोटा



**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्याची जीवनवाहिनी असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला (एसटी) सध्या दररोज १ ते २ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. सुमारे १२ हजार कोटी रुपयांचा संचित तोटा असलेल्या एसटीला केवळ तिकीट विक्रीवर अवलंबून राहणे आता शक्य नाही. या पार्श्वभूमीवर, महामंडळाने डिझेल खरेदीत पारदर्शकता आणून वार्षिक २४१ कोटींची बचत साधली असून, आता उत्पन्न वाढीसाठी व्यावसायिक इंधन विक्री आणि जाहिरात क्षेत्रात आक्रमक पाऊल टाकले आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटीचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी दिली.

फेब्रुवारी २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात एसटीला सुमारे ७५० कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. हा तोटा भरून काढण्यासाठी महामंडळाने 'पर्यायी उत्पन्न स्रोत' निर्माण करण्याची विशेष योजना आखली आहे. डिझेल खरेदीच्या निविदा प्रक्रियेत कोणताही राजकीय हस्तक्षेप न होऊ दिल्याने महामंडळाला मोठा आर्थिक फायदा झाला आहे. यापूर्वी प्रति लिटर मिळणारी २.७० रुपयांची सवलत आता ५.१३ रुपयांपर्यंत वाढली आहे. एसटीला वर्षाकाठी ४० कोटी लिटर डिझेल लागते, ज्यावर सुमारे ३ हजार ४०० कोटी रुपये खर्च होतात. नव्या निविदा प्रक्रियेमुळे दरात प्रति लिटर २.१३ रुपयांची अतिरिक्त सवलत मिळाल्याने महामंडळाचे वर्षाला २४१ कोटी रुपये वाचणार आहेत. काही कंपन्यांनी या प्रक्रियेत खोडा घालण्याचा प्रयत्न केला, मात्र न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने महामंडळाच्या पारदर्शक भूमिकेवर शिक्कामोर्तब झाले, असे सरनाईक यांनी नमूद केले.

– एसटी आता स्वतः व्यावसायिक इंधन विक्री क्षेत्रात उतरणार आहे. सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर राज्यातील १०० ते ११० ठिकाणी 'मल्टी-मोडल' इंधन पंप उभारले जातील. येथे डिझेल, पेट्रोलसह सीएनजी, एलएनजी आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधा असेल. धुळे येथील प्रायोगिक प्रकल्प यशस्वी झाला असून, या उपक्रमातून वार्षिक १०० कोटींचे उत्पन्न अपेक्षित आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

– इंधन भरताना होणारी गळती आणि अनियमितता रोखण्यासाठी महामंडळ आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) आधार घेणार आहे. प्रत्येक एसटी बसच्या इंधन टाकीला आणि पंपाच्या नोझलला एआय आधारित सेन्सर बसवले जातील. सध्याच्या पारंपरिक पद्धतीत दर १०० लिटरमागे होणारी ४ ते ५ लिटरची घट या तंत्रज्ञानामुळे पूर्णपणे थांबवता येईल.

एसटीच्या ६०० बसस्थानकांवरून दररोज ५० ते ५५ लाख प्रवासी प्रवास करतात. या 'फूटफॉल'चा वापर जाहिरातींसाठी केला जाणार आहे. डिजिटल फलक आणि बसच्या अंतर्गत-बाह्य भागातील जाहिरातींमधून पुढील पाच वर्षांत २५० कोटी रुपये मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सध्या हे उत्पन्न केवळ २० कोटींच्या घरात आहे.

त्याशिवाय बसस्थानकांच्या छतावर सौर प्रकल्प उभारून वीज विक्रीतून १५ कोटींची बचत केली जाणार आहे. चालक-वाहकांच्या ड्युटी नियोजनात एआयचा वापर करून ओव्हरटाइम खर्चात कपात केली जाईल, जुन्या बसच्या विल्हेवाटीतून अतिरिक्त महसूल मिळवण्याचे नियोजन आहे. एसटीमध्ये आर्थिक शिस्त आणि पारदर्शकता आणणे हे आमचे प्राधान्य आहे. केवळ सरकारी मदतीवर अवलंबून न राहता, स्वावलंबी होऊन एसटीला तोट्यातून बाहेर काढण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार-२०२५ साठी प्रवेशिका पाठविण्याकरीता मुदतवाढ

**नांदेड (प्रतिनिधी)** – माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका मागविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च, २०२६ असा होता. सदर पुरस्कारांसाठी प्रवेशिका मागविण्याकरीता दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून आणि मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील स्पर्धकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत.तसेच अर्जाचे नमुने वसळी.ारहरीरीहीीर.सीीं.ळप या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत.

अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार (राष्ट्रस्तरीय) रु.१ लाख रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार (मराठी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार (इंग्रजी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), बाबूराव विष्णू पराडकर पुरस्कार (हिंदी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्कार(उर्दू) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), यशवंतराव चव्हाण पुरस्कार शासकीय गट (मराठी) (माहिती व जनसंपर्क) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) पु.ल.देशपांडे उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार(राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), तोलाराम कुकरेजा उत्कृष्ट वृत्तपत्र छायाचित्रकार पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), केकी मूस उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार शासकीय गट (माहिती व जनसंपर्क) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), समाज माध्यम पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), स्वच्छ महाराष्ट्र जनजागृती पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), पत्रकार सुधाकर डोओफोडे अग्रलेखन पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), विभागीय पुरस्कार दादासाहेब पोतनीस पुरस्कार, (नाशिक विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, या व्यतिरिक्त रुपये १० हजार दै.गावकरीने पुरस्कृत केले आहेत.

अनंतराव भालेराव पुरस्कार, (औरंगाबादआणि लातूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), आचार्य अत्रे पुरस्कार, (मुंबई विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), नानासाहेब परूळेकर पुरस्कार, (पुणे विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), शि.म.परांजपे पुरस्कार, (कोकण विभाग) १ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), ग.गो.जाधव पुरस्कार, (कोल्हापूर विभाग) ५१ हजाररुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), लोकनायक बापूजी अणे पुरस्कार, (अमरावती विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार, (नागपूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र)

# 'जल जीवन मिशन २.0' साठी केंद्र आणि राज्य शासनात सामंजस्य करार




**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीचे डिसेंबर २०२८ पर्यंत 'हर घर जल' प्रमाणीकरण साध्य करणे तसेच पाणी पुरवठा योजनांचे सक्षम संचलन आणि देखभाल सुनिश्चित करण्याची प्रमुख उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेऊन केंद्र सरकारचे जलशक्ती मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्यात गुरुवारी नवी दिल्ली येथे सामंजस्य करार पार पडला.

याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपुरातून ऑनलाईन सहभागी झाले होते. केंद्रीय मंत्रिमंडळाने अलिकडेच 'जल जीवन मिशन' कार्यक्रमास डिसेंबर २०२८ पर्यंत मुदतवाढ दिली असून या नवीन टप्प्याला 'जल जीवन मिशन-२.०' असे संबोधण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने राज्यांनी संरचनात्मक सुधारणा, कालमर्यादेचे पालन, योजनांची शाश्वतता आणि नागरीक-केंद्रित सेवांचे वितरण सुनिश्चित करण्यासाठी हा सामंजस्य करार पार पडला.

या करारात काही प्रमुख उद्दिष्टे ठेवण्यात आली आहेत. त्यात प्रामुख्याने जल जीवन मिशन अंतर्गतच्या कामांची प्रभावी अंमलबजावणी आणि देखरेख करणे, ग्रामीण भागातील नळ पाणी पुरवठा पायाभूत सुविधा पूर्ण करून त्या ग्राम पंचायतींकडे हस्तांतरित करणे तसेच डिसेंबर २०२८ पर्यंत राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीने 'हर घर जल' प्रमाणीकरण साध्य करणे या मुद्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. याशिवाय पाणी पुरवठा योजनांचे सक्षम संचालन आणि देखभाल सुनिश्चित करण्यासह जिल्हा व राज्यस्तरावर संरचनात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठी पेयजल शाश्वतता आराखडा स्वीकारणे या उद्दिष्टांचाही समावेश या सामंजस्य करारात आहे.

# होर्मुझमध्ये अडकलेल्या भारतीय कॅप्टनचा मृत्यू; १८ दिवस समुद्रात अडकून वैद्यकीय मदतीअभावी अंत

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – पश्चिम आशियातील तणावाचा मानवी परिणाम समोर आला असून होर्मुझच्या सामुद्रधुनीत अडकलेल्या 'अवाना' जहाजाचे कॅप्टन राकेश रंजन सिंह यांचे निधन झाले आहे. २८ फेब्रुवारीपासून जहाज समुद्रात अडकले होते आणि तब्बल १८ दिवस तेथेच थांबावे लागले.

मूळचे बिहारमधील नालंदा जिल्ह्यातील रहिवासी असलेले सिंह यांचे कुटुंब सध्या रांची येथे राहते. त्यांच्या निधनाची बातमी समजताच कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

माहितीनुसार, १८ मार्च रोजी त्यांची प्रकृती अचानक बिघडली. जहाजावरील अधिकाऱ्यांनी दुबई एटीसीकडे एअर ॲम्ब्युलन्सची मागणी केली, मात्र युद्धजन्य परिस्थितीमुळे परवानगी मिळू शकली नाही. त्यानंतर बोटीने किनाऱ्यावर आणण्याचा प्रयत्न झाला, पण तोपर्यंत उशीर झाला होता. अखेरीस हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. 'अवाना' जहाजावर कॅप्टन सिंह यांच्यासह सुमारे ३५ कर्मचारी अडकले होते. या काळात त्यांना आवश्यक वैद्यकीय सुविधा मिळू शकल्या नाहीत, ज्यामुळे ही दुर्दैवी घटना घडल्याचे बोलले जात आहे.

# वादळी हवामानाचा अनेक उड्डाणांवर परिणाम; एअरलाइनकडून प्रवाशांसाठी ट्रॅव्हल ॲडव्हायझरी जारी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – देशातील दोन प्रमुख शहरे दिल्ली आणि बंगळुरू येथे मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याचा परिणाम हवाई सेवांवरही होऊ शकतो.यामुळे इंडिगो, एअर इंडिया आणि स्पाइसजेट यांनी प्रवाशांसाठी ट्रॅव्हल ॲडव्हायझरी जारी करत सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

इंडिगोने आपल्या प्रवाशांना सावध करत सांगितले आहे की खराब हवामानामुळे विमानांच्या आगमन आणि प्रस्थानात किरकोळ विलंब होऊ शकतो. एअरलाइनने म्हटले आहे की परिस्थिती हाताळण्यासाठी त्यांच्या टीम्स आधीपासून सज्ज आहेत, मात्र हवामानाच्या परिणामामुळे उड्डाण संचालनाचा वेग काहीसा मंदावू शकतो. प्रवाशांनी विमानतळावर जाण्यापूर्वी आपल्या फ्लाइटचा स्टेटस नक्की तपासावा, असा सल्ला देण्यात आला आहे.

तर एअर इंडियाने माहिती दिली आहे की दिल्ली आणि उत्तर भारतातील काही भागांत सतत पाऊस आणि जोरदार वाऱ्यांचा अंदाज आहे, ज्यामुळे दिल्लीहून येणाऱ्या-जाणाऱ्या उड्डाणांवर परिणाम होऊ शकतो. एअरलाइनने प्रवाशांना विनंती केली आहे की विमानतळासाठी निघण्यापूर्वी फ्लाइटची स्थिती तपासावी आणि संभाव्य वाहतूक कोंडी लक्षात घेऊन अतिरिक्त वेळ ठेवून घरातून निघावे.

# प्रीमियम पेट्रोलच्या किमतीत मोठी वाढ, २.०९ प्रति लिटर महागले




**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – मध्यपूर्वेतील वाढत्या तणावामुळे तेल आणि गॅस पुरवठ्यावरील संकट अधिकच गडद होत आहे. सामान्य जनतेला जी भीती होती तेच घडले आहे. आधी 'एलपीजी' सिलेंडरच्या संकटाशी झुंजणाऱ्या जनतेला आता पेट्रोलच्या किमतीचाही फटका बसला आहे. देशातील मोठ्या तेल कंपन्यांनी २० मार्च २०२६ पासून प्रीमियम पेट्रोलच्या किमतींमध्ये वाढ केली आहे.

देशातील प्रमुख तेल कंपन्यांनी 'स्पीड/पावर' प्रीमियम पेट्रोलच्या किमतीत प्रति लीटर २.०९ ची वाढ केली आहे. आधी ही किंमत १११.६८ प्रति लीटर होती, जी आता ११३.७७ प्रति लीटर करण्यात आली आहे.

याशिवाय इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने औद्योगिक डिझेलच्या किमतीतही मोठी वाढ केली आहे. ही किंमत ८७.६७ प्रति लीटरवरून थेट १०९.५९ प्रति लीटर करण्यात आली आहे. म्हणजेच औद्योगिक डिझेलमध्ये तब्बल २१.९२ प्रति लीटरची भाववाढ झाली आहे.

# राज्यात गारांचा पाऊस, तर कुठे उन्हाचा तडाखा



**पुणे (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रात सध्या हवामानाची दोन टोकाची रूपे पाहायला मिळत आहेत. राज्याच्या काही भागात उन्हाची तीव्रता वाढत असतानाच, दुसरीकडे विदर्भ आणि मराठवाड्यात मात्र वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली आहे. हवामान विभागाने (खचऊ) आज विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' जारी केला असून, काही ठिकाणी गारपिटीचा इशाराही देण्यात आला आहे.

विदर्भातील जिल्ह्यांमध्ये आज दुपारी ४ नंतर पावसाची तीव्रता वाढण्याचा अंदाज आहे. विशेषतः नागपूर, गोंदिया आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच बुलढाणा, अकोला, चंद्रपूर आणि भंडारा: येथे ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहतील आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल. वर्धा, गडचिरोली, यवतमाळ आणि वाशिम: येथे तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्याला ताशी ५०-६० किमी वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांचा फटका बसू शकतो, तिथेही विजांसह पावसाचा अंदाज आहे.

सांगली, सातारा, कोल्हापूर आणि अहिल्यानगर: या भागात काही ठिकाणी हलक्या सरी कोसळू शकतात. कोकण: मात्र, कोकण किनारपट्टीवर परिस्थिती वेगळी असून पुढील दोन दिवसांत तिथे उन्हाचे चटके पुन्हा वाढणार आहेत, ज्यामुळे नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागेल. दुपारनंतर पावसाची शक्यता असल्याने काढणीला आलेली पिके सुरक्षित स्थळी हलवण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. वाऱ्याचा वेग जास्त असल्याने झाडांखाली किंवा पत्र्याच्या शेडखाली आश्रय घेणे टाळावे, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

## रजिस्ट्री हरवली

मी, आनंदराव माणिकराव किडे दि. १० मार्च २०२६ रोजी वजिराबाद ते छत्रपती चौक ऑटो प्रवास करीत असताना प्लॉट रजिस्ट्रीची मूळ प्रत हरवली आहे. सदरील प्लॉट मी गोविंद प्रसाद द्वारकादास शुक्ला यांच्याकडू दि. ०५ जानेवारी २००१ रोजी खरेदी केलेला आहे. ज्याचा दस्त क्र. ७५/२००१ आहे. सदरील प्लॉट गट क्र. १९ चा भाग आहे. सदरील प्लॉट मी २०२० मध्ये खरेदी केलेला आहे. या प्लॉटचा मालकी हक्क माझ्या नावावर आहे. तरी कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :
आनंद माणिकराव किडे रा. विशालनगर, वाडी नांदेड
मो.नं. ९४२१९७६२३४३

## Change In Name

My old Name is Manjarmkar Padmakarrao which now I am changing as New Name Padmakar Manjarmkar Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Current Address: Manjarmkar Padmakar Near Indira Gandhi High-School Hudco new Nanded, ND-116 Hudco New Nanded, kautha, PO: cidco nanded, DIST: Nanded, Maharashtra -431603
Mo.9860470529

## जाहीर प्रगटन
### मा. जिल्हा न्यायाधीश-१, बिलोली यांच्या न्यायालयात
### दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ३८/२०२५

**मानवी मारोती कांबळे वि. महाराष्ट्र राज्य मार्फत जिल्हाधिकारी, नांदेड**

ज्याअर्थी अर्जदार मानवी पि. मारोती कांबळे वय-१४ वर्ष व्यवसाय-शिक्षण, मार्फत अज्ञान पालनकर्ती आई शिला मारोती दहीकांबळे वय ३८ वर्षे, धंदा-घरकाम रा. रमाईमाता कॉलनी, देगलुर, ता. देगलुर, जि. नांदेड यांनी या न्यायालयात कलम ८ हिंदु मायनॉरीटी ॲड गार्डीयनशीप ॲक्ट अंतर्गत देगलुर ता. देगलुर, जि. नांदेड येथील जमीन सर्व्हे नं. ३३/३ गट नं. ३९ मधील क्षेत्रफळ ० हे. ०१.१२ आर ही जमीन विकण्या करिता या न्यायालयात परवानगी मागीतली आहे.

सदरील मालमत्तेबाबत कोणाचा व कसलाही उजर अथवा आक्षेप असल्यास दिनांक २२/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वत: जातीने किंवा वकीलामार्फत या न्यायालयात हजर रहावे.

याव्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त दिवशी म्हणजेच दिनांक २२/०४/२०२६ रोजी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्ज एकतर्फी निकालात काढण्यात येईल.

आज दिनांक १७/०३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

अधिक्षक,
जिल्हा न्यायालय,बिलोली

## Change In Name

I am changing my name from SHAIKH NAZIM NAZIR to SHAIKH NAZEEM NAJEER for passport issuance. Where SHAIKH NAZIM NAZIR is the old name and SHAIKH NAZEEM NAJEER* is the new name.

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशील मौजे- चांडोळा,ता. मुखेड, जि.नांदेड,येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या शेत-जमिनी ह्या सदर जमिनींचे विद्यमान मालकांकडून भाडेतत्त्वावर२८ वर्षे ११ महिने घेण्याकरिता बोलणी करीत असून, त्याबाबत सदर मिळकती निर्वेध व बोजा-रहित असल्या बाबत मालकी हक्क तपासणी अहवाल (टायटल व सर्च रिपोर्ट) करून घेण्यासाठी आम्हाला विनंती केल्यावरून, प्रस्तुत नोटिशीद्वारे आवाहन करण्यात येते की, जर कोणाही व्यक्ती, एकत्रित / अविभाजित कुटुंब किंवा त्याचे घटक सदस्य, बँक व इतर वित्तीय संस्था, कंपनी वा सहकारी संस्था किंवा कोणीही सावकार, कर्जदाते, किंवा इतर कोणाही त्रयस्थ इसमाचा सदर मिळकतींबाबत कुठलाही हक्क, शीर्षक, हिस्सा, ताबा, वारसा-अधिकार, कौटुंबिक व्यवस्था / सेटलमेंट, दावा किंवा मागणी, बोजा, प्रतीकात्मक ताबा, अधिग्रहण/विभाजन अधिकार असल्यास किंवा सदर मिळकतीबाबत कुठल्याही व्यक्तीने वर नमूद जमीन मालक किंवा त्यांचे कुटुंबियांपैकी कोणाही बरोबर खरेदी-विक्री, विकसन, कुलमुखत्यार, अभिहस्तांतरण, समजपत्र, ट्रस्ट, रखरखाव, भाडेकरार, वहिवाटीचा परवाना, ईझमेंटरी राइट्स अथवा गहाण, तारण, इ. कुठल्याही स्वरूपाचा व्यवहार केला असल्यास, तसेच कोणत्याही न्यायालयीन आदेश/ मनाई हुकुम, लीस पेन्डन्स, जमिनीवरील आरक्षण इ. बाबत कोणाला काही माहिती असल्यास किंवा त्याला अनुसरून जर कोणाचाही प्रस्तुत व्यवहारास आक्षेप असल्यास, त्यांनी प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत आमचे खालील पत्यावर लिखित स्वरुपात व योग्य त्या कागदपत्रे व पुराव्यानिशी खात्री करून द्यावी, अन्यथा सदर मिळकतीवर इतर कोणाचाही हक्क-हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून, योग्य ती सर्व शहानिशा करून सदर मिळकतींचे मालकी हक्कांबाबत तपासणी अहवाल आमचे अशिलांस सादर केला जाईल. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही ह्याची नोंद घ्यावी. कळावे,

**परिशिष्ट (मिळकतींचे वर्णन)**

मौजे- चांडोळा,ता. मुखेड, जि.नांदेड येथील खालील नमूद शेत-जमिनी, त्यामधील तदंगभूत पीक, तृण-काष्ठ, फळझाडे, विहीरी, जलस्त्रोत, बांधकाम, चीजवस्तू व वहिवाटीचे हक्कांसह: -

| गट क्र. | गाव | क्षेत्रफळ (HectorAres) | मालकाचे नाव | (खाता क्र.) |
|---|---|---|---|---|
| ७४ | चांडोळा | ० हे३३ आर | सुमित गंगाधर तमशेट्टे | ७१७९० |
| १०७ | चांडोळा | १ हे२९ आर | व्यंकट विठ्ठल माचनवाड | ६८८ |
| १०३ | चांडोळा | ०हे४५ आर | मेहरुबि सादीक शेख | ७१८६० |
| १०१ | चांडोळा | ० हे७७ आर | शेख सादीक अहेमद | ७२० |
| १०६ | चांडोळा | ० हे ८५ आर | संजय काशीनाथ स्वामी | ७१९२७ |
| १४० | चांडोळा | ० हे३६ आर | बाबू रेहमानखान पठाण | ७१२२४ |
| ७३ | चांडोळा | १ हे ४० आर | रेणूकाबाई दत्तू आंबेवाड | ७२१ |
| ७५ | चांडोळा | ० हे १८ आर | केशव लक्ष्मण आंबेवाड | ७१७२९ |
| ७५ | चांडोळा | ० हे३८ आर | अमित गंगाधर तमशेट्टे | ७१७७५ |
| ९१ | चांडोळा | ०हे ८७ आर | गंगाबाई विठ्ठल वाघमारे | ७१७१३ |
| १३६ | चांडोळा | ० हे ३५ आर | बाबू इस्माईलखान पठाण | ७४ |
| १३७ | चांडोळा | १ हे १७ आर | बाबू इस्माईलखान पठाण | ७४ |
| १४१ | चांडोळा | ० हे ८१ आर | बाबू इस्माईलखान पठाण | ७४ |
| १३६ | चांडोळा | ० हे ८३ आर | मौलानबी इस्माईलखान पठाण<br>रहीमबी जलालसाब पठाण<br>यादूलाखा इस्माईलखान पठाण<br>बाबू इस्माईलखान पठाण | ७१४६६ |
| ७२४ | चांडोळा | ० हे६२ आर | जेजेराव सांभा झटकवडे | ११३६ |
| ७३३ | चांडोळा | ० हे ८१ आर | सुनीता शंकर झटकवडे | ७१६८७ |
| ८११ | चांडोळा | ० हे ८६ आर | शेषबाई विठ्ठल नवेकर बालाजी विठ्ठल नवेकर गजानन विठ्ठल नवेकर उज्ज्वला पिंटु अदारी<br>धनाश्री विठ्ठल कोलाठी<br>कविता बंडू अदारी<br>सविता बंडू कोलाठी<br>ज्योति छगू जाधव | ८७३ |
| ८११ | चांडोळा | ० हे ५४ आर | राजू बाबू राठोड | ७१९२३ |
| ८११ | चांडोळा | ० हे ५४ आर | धोंडीबा बाबू राठोड | ७१९२४ |
| ८११ | चांडोळा | ० हे ५४ आर | बालाजी बाबू राठोड | ७१९२५ |
| १५५ | चांडोळा | १ हे०३ आर | बाबू तेजेरओ देवकत्ते | ५०७ |
| १५५ | चांडोळा | ० हे ६३ आर | विठ्ठल तेजेरओ देवकत्ते | ८४२ |
| १५५ | चांडोळा | ० हे २० आर | दयानेश्वर विठ्ठल देवकत्ते | ७१६२५ |
| १५५ | चांडोळा | ० हे २० आर | राजू विठ्ठल देवकत्ते | ७१५०२ |
| १५६ | चांडोळा | ० हे ६० आर | सुभाष मलबा देवकत्ते | ७१३५२ |
| १५६ | चांडोळा | ० हे ६२ आर | माधव मारोती देवकत्ते | ७१५३२ |
| १५७ | चांडोळा | १ हे ०० आर | मारोति लक्ष्मण देवकत्ते | १७९ |
| १५७ | चांडोळा | १ हे १३ आर | लक्ष्मण पिरण देवकत्ते | ८१५ |
| १५७ | चांडोळा | ० हे ३९ आर | सुनीता राजू सुरनर | ७१३६७ |
| १५७ | चांडोळा | ० हे ८७ आर | ज्योति पिरण देवकत्ते | ७१५१५ |
| १५७ | चांडोळा | ० हे ८७ आर | स्वाती राजकुमार देवकत्ते | ७१५१६ |
| १५८ | चांडोळा | २ हे ०० आर | कुसुमबाई हणमंतराव | १३० |
| १५८ | चांडोळा | २ हे १८ आर | हणमत शेषेराव | १०९१ |
| १५८ | चांडोळा | १ हे ३७ आर | महेश माणिकराव साखरे | ७१६३६ |
| १५९ | चांडोळा | १ हे २० आर | महेश माणिकराव साखरे | ६८१ |
| १५९ | चांडोळा | ० हे ५५ आर | हणमत शेषेराव साखरे | ७१२५५ |
| १५९ | चांडोळा | ३ हे ६७ आर | पंकाजकुमार सतीश साखरे | ७१६२८ |
| १५९ | चांडोळा | ३ हे ०५ आर | लक्ष्मीबाई माणिकरओ साखरे | ७१६४९ |
| १५९ | चांडोळा | ० हे ५८ आर | सोमनाथ शिवानंद साखरे | ७१७८० |
| १३२ | चांडोळा | २ हे ०२ आर | दिगंबर गोविंद देवकत्ते | ३६९ |
| १३२ | चांडोळा | ०हे ६० आर | कलिम मंगदुम पठाण | १६३५ |
| १३२ | चांडोळा | ० हे ३२ आर | अहेमद मंगदुम पठाण | ७१७७६ |
| ८७८ | चांडोळा | १ हे ०७ आर | बाबू विठ्ठल खानापुरे | ७१४३१ |

**जाहिरात प्रसिद्ध दिनांक:**२१-०३-२०२६
**वकिलामार्फत:**राहुल पसाळकर
**कार्यालयाचा पत्ता:**ऑफिस क्र ४, ३ रा मजला, साई कॉम्प्लेक्स, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४
**संपर्क क्रमांक:** 8390215140

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७९१९०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# गुरुद्वारा बोर्डाच्या १७० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पास मंजुरी -डॉ. विजय सतबीरसिंघ

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील श्री गुरू अंगद देवजी यात्री निवास येथील कार्यालयात सचखंड गुरुद्वारा बोर्डाचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. ज्यामध्ये विविध प्रस्ताव पारीत करण्यात आले. गुरुद्वारा बोर्डाच्या १७० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पास मंजुरी देण्यात आली असल्याचे प्रशासक डॉ. विजय सतबीरसिंग यांनी सांगितले.



यावेळी मुख्यतः शैक्षणिक विषयांवर सविस्तर चर्चा झाली. श्री गुरु तेग बहादर साहिबजी यांच्या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला व खालसा हायस्कूल येथील शाळेची नवीन सर्व सुविधायुक्त इमारत बांधण्याचे नियोजित करण्यात आले. तसेच सौर ऊर्जा निर्मितीसाठी सोलार प्लांट लावणे, होतकरू विद्यार्थ्यांसाठी विविध स्कॉलरशीप देण्यावर भर देण्यात आला. महिलांसाठी फ्री-एज्युकेशन स्किम आणण्याचा प्रयत्नसुध्दा करण्यात येईल, असे प्रशासक यांनी सांगितले.

तसेच जे विद्यार्थी विविध क्षेत्रामध्ये निपुण आहेत व त्यांचे अभ्यासक्रम सुध्दा पूर्ण झालेले आहेत अशा सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी श्री गुरू अर्जन देवजी महाराज यांच्या नांवे 'जॉब इन्फॉरमेशन सेंटर' श्री हजूर साहिब सार्वजनिक वाचनालयात सुरु करण्यात आले. या सर्व प्रस्तावित सामाजिक व शैक्षणिक कार्यांसाठी १७० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

या बैठकीत गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीरसिंघ, सल्लागार जसवंत सिंघ (बॉबी), प्र. अधीक्षक रविंदरसिंघ कपूर, सहायक अधीक्षक जयमलसिंघ ढिल्लो, सहाय्यक अधीक्षक बलविंदर सिंघ फौजी, स्वीय सहायक बबीताकौर चाहेल, लेखापाल सतविंदरसिंघ रामगडीया व इतर मान्यवर उपस्थित होते.

# चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्षानिमित्त सिडको येथे डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाड चवदार तळे सत्याग्रह समता शताब्दी वर्षाला दि. २० मार्च रोजी प्रारंभ झाला असून, या दिनाचे औचित्य साधून सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या वतीने, सिडको येथे शुक्रवार, दि. २० मार्च रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी महाड चवदार तळे सत्याग्रह केले होते. या सत्याग्रह शताब्दी वर्षाला शुक्रवार, दि. २० मार्च रोजी प्रारंभ होत असल्याचे औचित्य साधून सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या वतीने सिडको येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष बापूसाहेब पाटील, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी जे. पी. पाटील, डॉ. अशोक कलंत्री, शेख मोईन लाठकर, किशन रावणगावकर, गोपीनाथ कहाळेकर, माणिक श्रोते, संजय कदम, भगवान जोगदंड, अजय गालेवाड, सोपान भुरे आदींसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# नांदेडमध्ये पाडव्याच्या मुहूर्तावर हळदीला मिळाला १५००१ रु. भाव



**अर्धापूर (प्रतिनिधी)** –पाडव्याच्या मुहूर्तावर हळदीला १५००१ रुपये भावाने खरेदीचा शुभारंभ कृऊबाचे सभापती संजय देशमुख लहानकर यांच्या उपस्थितीत गुरुवार, दि. १९ मार्च रोजी बाजार समितीत शुभारंभ झाला आहे.

नांदेड कृषी उत्पन्न बाजार समिती येथे अनेक शेतकऱ्यांनी पाडव्याच्या मुहूर्तावर हळद विक्रीसाठी आणली होती. हळद खरेदी शुभारंभ सभापती संजय देशमुख लहानकर, संचालक सदाशिव देशमुख, कृऊबाचे सचिव माणिकराव बारसे, सहसचिव गणेश भारसावडे, व्यापारी बद्रीनाथ मंत्री, गोपाल धूत, द्वारकादास मुंदडा, विजयकुमार गोयंका, प्रवीण कासलीवाल आदींच्या उपस्थितीत करण्यात आला. रोडगी येथील शेतकरी भुजंगराव सितापराव यांच्या हळदीला १५००१ रुपये भाव मिळाला असून, व्यापाऱ्यांनी खरेदीचा शुभारंभ पाडव्याच्या मुहूर्तावर केला आहे.

हळदीला चांगला भाव मिळाला असून, भविष्यात असाच हळदीला भाव मिळावा, अशी प्रतिक्रिया शेतकरी भुजंगराव सितापराव रा.रोडगी ता.अर्धापूर यांनी दैनिक गोदातीर समाचारशी बोलताना दिली आहे.

# रूपाली चाकणकर यांचा राजीनामा घ्यावा -जिजाऊ ब्रिगेड



**नांदेड (प्रतिनिधी)** –रूपाली चाकणकर यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी जिजाऊ ब्रिगेडने एका निवेदनाद्वारे केली आहे.

जिजाऊ ब्रिगेड नांदेडच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांना महिलांच्या संरक्षणासाठी असणाऱ्या महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर ह्या भक्तीच्या नावाखाली अनेक महिलांचे शोषण करून अत्याचार झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या अशोक खरात यांच्या शिष्या आहेत. या प्रकरणात त्यांनी कसलीही प्रतिक्रिया दिली नसल्याने चाकणकरांकडे असलेल्या महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा घ्यावा, या मागणीचे निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा कल्पना चव्हाण, सुमित्रा वडजकर, डॉ. विद्या पाटील, अर्चना होगे, सुनिता कल्याणकर आदींसह अन्य पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# बालिकेवर अत्याचार करणाऱ्यास २० वर्षांची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)** –मुखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या अल्पवयीन बालिकेवर अत्त्याचार करणाऱ्या नराधमाला मुखेडचे विशेष न्यायाधीश एस. पी. देशमुख यांनी २० वर्षे सक्तमजुरी आणि १० हजार रुपये रोख दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

अल्पवयीन बालिका दि. १६ जानेवारी २०२३ रोजी सकाळी शाळेत आली असता पिराजी मारोती गवाले हा तिथे आला व पीडितेस म्हणाला की, आपण जत्रेला जाऊ, तो ओळखीचा असल्याने त्याच्यावर विश्वास ठेवून बालिका त्याच्या गाडीवर बसली असता त्याने गाडी निर्जन ठिकाणी नेली व बालिकेचा हात धरुन तिला शेतातील झुडपामध्ये घेऊन गेला. बालिकेने नकार दिला असता त्याने जबरीने लैंगिक अत्याचार केला. यानंतर बालिका ही घरी आल्यानंतर सदरची घटना आईला सांगितली. तेव्हा तिच्या फिर्यादीवरुन आरोपी पिराजी मारोती गवाले विरुद्ध गु.र.क्र. २०/२०२३ अन्वये मुखेड पोलीस स्टेशन येथे भा. द. वी. चे कलम ३७६, ३६३, ५०६ व कलम ४ व ८ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झाला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक गजानन काळे यांनी करून न्यायालयात दोषारोप पत्र दाखल कले.

या प्रकरणात सरकार पक्षातर्फे ८ साक्षीदार तपासले. साक्षीदारांची साक्ष व सरकार पक्षाचा युक्तिवाद धरुन पोक्सो न्यायालयाचे विशेष न्यायाधीश देशमुख यांनी दि. १८ मार्च २०२६ रोजी आरोपी पिराजी मारोती गवाले कलम ४ पोक्सो अंतर्गत दोषी धरुन आरोपीस २० वर्षे सक्तमजुरी आणि १० हजार रुपये रोख दंड, कलम ३६३ भा. द. वी अन्वये ३ वर्षे कारावासख ५ हजार रुपये दंड तसेच कलम ५०६ अन्वये १ वर्ष कारावास आणि १ हजार दंड कलम ८ पोक्सो अन्वये ३ वर्षे कारावास, ५ हजार रोख दंड ठोठावला आहे. या सर्व शिक्षा आरोपीला एकत्र भोगायच्या आहेत. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता ॲड. गजानन भिकाजी खिल्लारे यांनी काम पाहिले.

# दुचाकी चोरटा एलसीबीच्या जाळ्यात; चार दुचाकी जप्त, पाच गुन्हे उघड

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहर आणि जिल्ह्याच्या विविध भागांतून दुचाकींची चोरी करून पोलिसांना गुंगारा देणारा चोरटा अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकला. त्याला शिताफीने पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे यांच्या पथकाने रंगेहात पकडले. त्याच्याकडून चार चोरीच्या दुचाकी जप्त केल्या असून लवकरच त्याचे इतर तीन साथीदार पोलिसांच्या तावडीत येतील असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी यांचे वेगवेगळे पथके तयार करून दुचाकी चोरीचे गुन्हे उघड आणि पाहिजे व फरार आरोपींना पकडण्याच्या सुचना दिल्या होत्या.

बुधवार, दि. १८ मार्च रोजी पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे व त्यांच्या पथकाला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, बन्नाळी चौक धर्माबाद जि. नांदेड येथे बिलोली ठाण्यात गु.र.नं. २०५/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या. सं. २०२३ मधील फरार असलेला आरोपी शेख इम्रान ऊर्फ अबु शुटर ऊर्फ डॉन ऊर्फ समीर शेख सलीम (वय २२ वर्षे, रा. रामनगर धर्माबाद) हा चोरीची दुचाकी ताब्यात घेवुन तिची विक्री करण्यासाठी थांबलेला आहे, अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने पोउपनि तुकडे व त्यांच्या टीमने नमूद चोरट्यास सापळा रचून अत्यंत शिताफीने ताब्यात घेवुन विचारपूस केली असता त्याने व त्याचे सराईत



असलेल्या गुन्हेगार साथीदारांनी मिळून नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद, मुखेड, कुंटूर येथील पल्सर कंपनीच्या दुचाकी चोरून ते लाल बहादुर शास्त्री महाविद्यालयाच्या पाठीमागील जंगलात लपवून ठेवल्याचे सांगितले. त्यावरून आरोपी शेख इम्रान ऊर्फ अबू शुटर ऊर्फ डॉन ऊर्फ समीर शेख सलीम याचे ताब्यातून ४ मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. आरोपीने चोरी केलेल्या मोटारसायकल संबंधाने अभिलेखाची पाहणी केली असता पोलीस ठाणे धर्माबाद येथे २ गुन्हे, पो. स्टे. मुखेड व कुंटूर येथे प्रत्येकी १ गुन्हे असे एकूण ४ गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी शेख इमान ऊर्फ अबू शुटर ऊर्फ डॉन ऊर्फ समीर शेख सलीम याच्याविरुध्द निझामाबाद (राज्य तेलंगना) येथे १७ गुन्हे दाखल असून, सदर गुन्ह्यांत सुध्दा तो फरारी होता. सदर गुन्ह्यातील निष्पन्न आरोपी व मुद्देमाल पुढील तपास कामी पोलीस स्टेशन धर्माबाद यांच्या ताब्यात देण्यात आला आहे. सदर कामगिरी करणारे अधिकारी व अमंलदार यांचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले आहे.



**नांदेड** –मगनपुरा येथील दिंडोरी प्रणीत श्री स्वामी समर्थ महाराजांच्या केंद्रात श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त महाआरतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिला व पुरूष भाविक मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. **(छाया : नरेंद्र गडप्पा, नांदेड)**

# विनयभंग प्रकरणी आरोपीविरुद्ध १२ तासांत दोषारोपपत्र दाखल

**शंकरनगर (प्रतिनिधी)** –नरसी येथे घडलेल्या विनयभंग प्रकरणात रामतीर्थ पोलिसांनी अवघ्या १२ तासांत तपास पूर्ण करून आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले आहे.

नरसी येथे एका महिलेचा विनयभंग झाल्याची घटना घडली होती. पीडित महिलेच्या तक्रारीवरून रामतीर्थ पोलीस ठाण्यात १८ मार्च २०२६ रोजी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ७४ अन्वये प्रथमेश परमेश्वर गुंड (रा. हिवरसिंगा, ता. शिरूर, जि. बीड) याच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन सपोनी विक्रम हराळे यांनी तत्काळ पथकासह कारवाई करत आरोपीला अटक केली. त्यानंतर मिशन निर्भया अंतर्गत तपासाची चक्रे वेगाने फिरवून सर्व पुरावे गोळा करण्यात आले. विशेष म्हणजे संपूर्ण तपास प्रक्रिया पूर्ण करत अवघ्या १२ तासांत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

# गुढीपाडव्यानिमित्त आर्य वैश्य समाजाकडून काढण्यात आली रॅली



**लोहा (प्रतिनिधी)** –चैत्र शुक्ल प्रतिपदेला हिंदू धर्माचे नूतन वर्ष हे गुढीपाडव्यापासून सुरू होत असल्याने हा शुभ मुहूर्त म्हणजे साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. सकाळी मुहूर्त वेळेनुसार घरोघरी गुढी उभारल्यानंतर लोहा शहरातील समस्त आर्य वैश्य समाजातील पुरूष, महिला व युवकांनी नववर्षावचे स्वागत करण्यासाठी नगरेश्वर मंदिरात एकत्र जमून सर्वांनी फेटे बांधून हाती ध्वज पताके घेऊन वाजंत्रीसह शहरातून रॅली काढली.

हिंदू नववर्ष गुढीपाडव्याच्या दिवशी दि. १९ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता नगरेश्वर मंदिरात दर्शन घेऊन तेथून भाजी मंडई, शिवकल्याण नगर, माऊली नगर परत नगरेश्वर मंदिर असे मार्गक्रमण करून आर्य वैश्य समाजाची रॅली मोठ्या थाटामाटात पार पडली. यावेळी रॅलीमध्ये सहभागी महिला, पुरुष व युवक पारंपरिक पोशाख घालून भगवा फेटा बांधून मुखे परमेश्वराचे नामस्मरण करत ढोल-ताशा गजरात रॅलीत सहभागी झाले होते.

यावेळी आर्य वैश्य समाज कमिटीतील सर्व पदाधिकारी तसेच महिला, पुरुष, युवक यांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून रॅली यशस्वी केल्याबद्दल आर्य वैश्य समाज कमिटीचे अध्यक्ष दिनेश सावकार तेललवार यांनी संपूर्ण समाज बांधवांचे आभार मानले.

# पतंजलीतर्फे नववर्ष गुढीपाडव्यानिमित्त १११ कुंडी संकल्प यज्ञ संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** –पतंजली योग परिवार नांदेडतर्फे गुरुवार, दिनांक १९ मार्च रोजी गुढीपाडवा नववर्षानिमित्त आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या उपस्थितीत १११ कुंडी संकल्प यज्ञ पार पडला.

अशोक नगर हनुमान मंदिर ठिकाणी सकाळी ५.३० ते ७ दरम्यान निःशुल्क योग सत्र झाले. त्यानंतर ७ ते ७.३० दरम्यान १११ कुंडी यज्ञ नारायणराव कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. पतंजलीच्या साधकांनी विश्वशांती प्रार्थना केली. स्वतः परिवारासोबत निरोगी राहण्यासाठी नियमित योग करण्याचा संकल्प केला. त्यानंतर ७.३० ते ८ दरम्यान गुढी पूजन व दीपप्रज्वलन झाले. नंतर सर्वांना महाप्रसाद प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी सर्वश्री शिवाजीराव शिंदे हळदेकर, सदाशिव बुटले पाटील, हरिहर नरवाडे, राजेंद्र शंकरपुरे, जनार्दन आठवले, हनुमंत ढगे, सुरेश लंगडापुरे, ताराबाई दळवी, निवृत्ती रायमुळे, अंगद शिंदे, शिवानंद स्वामी, भरत टेकाळे, यशोदाबाई शिंदे, विकास बनगिनवार, स्मिता बनगिनवार, दिलीप आघाव, सुनिता आघाव, अवधूत गिरी, भाग्यलक्ष्मी गडप्पा, सविताताई गबाळे, रवींद्र कंधारकर, नामदेवराव मोहिते, चित्रा कंधारकर, शिवकुमार गंजेवार, आदित्य परदेशी, अमर परदेशी, देवेश सलगरकर, श्रीरंग मोरे, किशन इबितदार, किरण मुत्तेपवार, मुंजाजी जाधव, सुभाष जाधव, व्यंकट कल्याणपाड, प्रतिभाताई पाटील पंडित पाटील, शंकर परकंटे, भगवान किडे, के. एस. जाधव, बापूराव मोरे, महादेव महाजन, शोभा कापसे, गंगाधर इंगोले, शैलेंद्र नावडे, शंकर महाजन, सौ. महाजन, हनुमंत ढगे, व्यंकट कोडगिरे, निर्मलाबाई कोरे, चंदाताई हळदे, सामलेटी नागभूषण, विनोद मालू, मीनाक्षी चिल्लरगे, मंगल पाटील, श्याम मालपाणी, सविता पवार, सुनीता डांगे, शीला येरावार, विष्णू शिंदे, अनिल कदम, संगीता भोंगे, सरोज साटेवार, जानकी कोलंपले, अनिता आठवले, शैलेंद्र नावडे, राजू शेटे, सरस्वती कांबळे, मनीषा गोवंदे, केवलाबाई कांबळे, स्वर्ण वाघमारे, अर्जुन रांधड, गोविंद कल्याणपाड, पुंडलिक कोडगिरे, सौ. मोहिते, भगवान देशमुख, छाया देवर, आर. जे. कदम, राठोड, दिगंबर वेताळकर, सौ. येताळकर, राजश्री सावंत, उत्तरा जोशी, शर्मिला लंगडापुरे, जयश्री कल्याणपड आदी मान्यवर उपस्थित होते, असे अनिल अमृतवार यांनी कळविले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com